

महाराष्ट्र
# संरक्षित क्षेत्र वार्तापत्र
वन्यजीव संरक्षणविषयक घडामोडींचे त्रैमासिक

खंड ३, अंक १ — जानेवारी २०२२ (क्र.८)

## अनुक्रमणिका

**संपादकीय** ३

क्षेत्रीय वनकर्मचाऱ्यांच्या समस्यांचे भिजत घोंगडे

**संरक्षित क्षेत्रातील बातम्या**

कारंजा सोहोळ अभयारण्य ४

कारंजा सोहोळ अभयारण्यात वाघाच्या उपस्थितीमुळे नवा संचारमार्ग प्रकाशात

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प ४

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातील रानतळोधी गावाच्या पुनर्वसनास न्यायालयाची मंजुरी

ताडोबासह गडचिरोलीतील पाळीव हत्ती गुजरातेत पाठवण्याचा वन विभागाचा निर्णय

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात वाघाच्या हल्ल्यात वनरक्षकाचा मृत्यू

पर्यटनासाठी ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात बंदिस्त वाहने

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या क्षेत्र संचालकांची कार्यकाळ होण्यापूर्वी बदली

पेंच व्याघ्र प्रकल्प ७

पेंच व्याघ्र प्रकल्पातील वाघिणीचा मृत्यू विषबाधेमुळे झाल्याचा अंदाज

महेंद्री संवर्धन राखीव ७

महेंद्रीच्या जंगलाला अभयारण्याचा दर्जा देण्याची सात गावांची मागणी

**राज्यस्तरीय बातम्या** ८

वन्य प्राण्यांचे रस्ते व रेल्वे मार्गावरील अपघाती मृत्यू टाळण्यासाठी केंद्राकडे पाठपुरावा करण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश

वनगुन्ह्यांच्या तपासात पोलिसांना महत्त्वाची भूमिका देण्याचा राज्याच्या व्याघ्र कक्ष समितीचा निर्णय

जिल्हा व विभागस्तरीय व्याघ्र कक्ष समित्यांच्या त्रैमासिक बैठका वर्षभर लांबणीवर

राज्यात वन्यजीव गुन्हे कक्षाची उभारणी; राज्यासाठी वन्यजीव अपराध नियंत्रण शाखेची वन्यजीव मंडळाच्या सदस्याची मागणी

व्याघ्रगणनेदरम्यान वनरक्षकाचा वाघाच्या हल्ल्यात मृत्यू; गणनेच्या प्रक्रियेतील त्रुटी उघड

विदर्भातून वाघांचे राज्यात इतरत्र स्थलांतर करण्यासाठी वन खात्याचे नियोजन

मृगया चिन्हांच्या जतनासाठी राज्यात नागपूर इथे मंजूर झालेल्या प्रयोगशाळेची उभारणी लांबणीवर

राज्यातील पहिली वन्यजीव जनुकीय तपासणी प्रयोगशाळा नागपुरात

किशोर रिठे यांना ‘महाराष्ट्राची गिरीशिखरे’ पुरस्कार

पश्चिम महाराष्ट्र

सातारा जिल्ह्यातील कऱ्हाडमध्ये मुंगसांच्या केसांपासून बनवलेले रंगकामाचे ब्रश जप्त

सांगली जिल्ह्यात उसाच्या फडात गवे शिरताच बिबट्या बाहेर; सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर बाजारपेठेत गवा

गव्याने मुक्काम केल्यामुळे सांगली बाजार समिती एक दिवस बंद; आर्थिक व्यवहार ठप्प

कोल्हापूर शहर व परिसरात गव्यांच्या वाढत्या फेऱ्या; हल्ल्यांमध्ये युवक ठार व महिला जखमी

कोल्हापूर जिल्ह्यातील आजरा तालुक्यात व्याघ्रगणनेदरम्यान आढळल्या वाघाच्या अस्तित्त्वाच्या खुणा

विदर्भ

कमलापूर वनपरिक्षेत्रातील हत्ती गुजरातेत पाठवण्याच्या निर्णयाला स्थानिकांचा विरोध


गडचिरोली जिल्ह्यात ओदिशातून आला हत्तींचा कळप
उमरेड शहरात वाघाचे दात व नखांसह पाच जणांना अटक
कोकण
कोकण किनारपट्टीवर येणाऱ्या सागरी कासवांचा विणीचा हंगाम यंदा लांबला
वेळास इथे ऑलिव्ह रिडले कासवाचे उपग्रह अंकन; पश्चिम किनारपट्टीवर प्रथमच
कोकणात खवलेमांजराच्या तस्करीत वाढ

माणूस-बिबट्या १८
चार महिन्यांत १८० किमी प्रवास करून बिबट्या जुन्नर वनपरिक्षेत्रात परतला
माणूस-बिबट्या संघर्ष संक्षिप्त वृत्त १९

**राष्ट्रीय बातम्या** २०
संरक्षित क्षेत्रात प्रकल्प उभारणीसाठी निश्चित शुल्क आकारणी नाही
भारतातील पाच पक्षी प्रजातींच्या IUCN रेड लिस्टमधील धोक्याच्या श्रेणींत बदल
वर्ष २०२१ मध्ये पहिल्या दहा महिन्यांत देशात १०२ वाघांचा मृत्यू
महाराष्ट्रासह अन्य सहा राज्यांच्या वन विभागांत सामील होणार १४ प्रशिक्षित कुत्रे
वन्यजीव संरक्षण कायद्यातील प्रस्तावित बदलांना तज्ज्ञांचा आक्षेप
भारतात चित्ते आणण्यासाठी व्याघ्र प्रकल्पातून निधीची तरतूद

**थोडक्यात पण महत्त्वाचे...** २४
चतुर आणि टाचणी – सिंधुदुर्ग जिल्ह्यातील विविधता

**महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र**
**खंड ३, अंक १, जानेवारी २०२२ (क्र. ८)**
संपादकः रेश्मा जठार
साहाय्यक संपादकः पंकज सेखसरीया
साहाय्यकः राधिका अघोर
शीर्षक व इतर रेखाचित्रेः अश्विनी मेनन Visual Design Studio
प्रकाशकः कल्पवृक्ष
**संपादकीय पत्ताः** C/o कल्पवृक्ष, अपार्टमेंट ५, श्री दत्त कृपा, ९०८, जिमखाना, पुणे ४११००४, महाराष्ट्र, भारत.
**दूरभाष/फॅक्सः** ०२० २५६५४२३९ **ई मेलः**marathipaupdate@gmail.com
**संकेतस्थळः** https://kalpavriksh.org/documentation-outreach/newsletters/
***
टीपः 'महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्रा'त प्रकाशित बातम्या या त्या त्या बातमीखाली दिलेल्या मूळ प्रकाशनातील बातम्यांवर संपादकीय सोपस्कार करून प्रकाशित केलेल्या आहेत.
***
'महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्रा'च्या प्रकाशनासाठी अर्थसाहाय्य
**दुलीप मथ्थाई नेचर कॉन्झर्वेशन ट्रस्ट**
c/o फाऊण्डेशन फॉर इकॉलॉजिकल सेक्युरिटी http://fes.org.in/
आणि
**अनेक हितचिंतकांच्या वैयक्तिक देणग्या**
***



## संपादकीय

### क्षेत्रीय वनकर्मचाऱ्यांच्या समस्यांचे भिजत घोंगडे

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात नोव्हेंबर महिन्यात व्याघ्रगणनेच्या कामादरम्यान वाघाच्या हल्ल्यात महिला वनरक्षकाचा मृत्यू झाला आणि पुन्हा एकदा वन विभागातील क्षेत्रीय कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा, त्यांना ज्या कठीण परिस्थितीत काम करावे लागते त्याचा मुद्दा चर्चेत आला. वास्तविक आणि दुर्दैवाने ही समस्या जुनीच आहे. दुर्दैवाने म्हणण्याचे कारण की एखादी दुर्घटना घडली की तेवढ्यापुरती ही समस्या चर्चेत येते आणि दिवस उलटले की पुन्हा मागे पडते. समस्येवर कायमस्वरुपी तोडगा मात्र निघालेला नाही.

क्षेत्रीय वनकर्मचारी किंवा ज्यांना 'फ्रंटलाइन स्टाफ' म्हणतात त्यामध्ये वनमजूर, वनरक्षक, वनपाल आणि वनपरिक्षेत्र अधिकारी यांचा समावेश होतो. प्रत्यक्ष वनांमध्ये फिरून वन विभागाची कामे करण्याची जबाबदारी या क्षेत्रीय कर्मचाऱ्यांची असते. ठिकठिकाणचा भूगोल, हवामान, विविध प्रकारची वने व त्यांतील नानाविध अधिवास ह्यामुळे उद्भवणाऱ्या आव्हानात्मक परिस्थितीचा सामना या क्षेत्रीय कर्मचाऱ्यांना करावा लागतोच आणि त्यात भर पडते ती व्यवस्थेच्या या कर्मचाऱ्यांप्रती असणाऱ्या असंवेदनशील दृष्टिकोनाची. प्रत्यक्ष कामातील धोके व आव्हानांपेक्षा व्यवस्थेने लादलेल्या परिस्थितीत काम करावे लागल्याने भल्याभल्या उत्साही, तरुण कर्मचाऱ्यांमध्ये नोकरीच्या सुरुवातीलाच कामाविषयी उदासीनता निर्माण झाली नाही तरच नवल.

जबाबदारी महत्त्वाची, काम धोक्याचे मात्र त्याच्या अंमलबजावणीसाठी व्यवस्थेकडून दिल्या गेल्या पाहिजेत अशा सोयीसुविधा, योग्य मार्गदर्शन आणि सक्रीय पाठिंब्याची वानवा, अशी या क्षेत्रीय कर्मचाऱ्यांची वस्तुस्थिती आहे. व्यवस्था ह्या फळीतील कर्मचाऱ्यांचा पुरेसा आदर करत नाही ह्याचे दुष्परिणाम त्यांना वन विभागाबाहेरही सोसावे लागतात. अन्यथा सातारा जिल्ह्यात कर्तव्य बजावणाऱ्या महिला वनरक्षकाला मारहाण करण्याची माजी लोकप्रतिनिधीची हिंमत झाली नसती. महिला क्षेत्रीय कर्मचाऱ्यांना सामान्यतः क्षेत्रीय कर्मचाऱ्यांसमोर असलेल्या समस्यांबरोबर महिला म्हणून अन्य काही समस्यांचाही सामना करावा लागतो.

व्याघ्रगणनेसाठी कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले जाते मात्र प्रशिक्षणाचा भर हा गणनेदरम्यान माहिती कशी भरायची ह्यावरच अधिक असतो. यंदा देशव्यापी व्याघ्रगणना प्रथमच मोबाईल फोनवर एपमार्फत करण्यात आली. त्यामुळे प्रशिक्षणाच्या केंद्रस्थानी एपचा वापर कसा करावा, हाच मुद्दा होता. तेव्हा इतर नियम, मुद्द्यांची उजळणी किती वेळा व कितपत परिणामकारकरित्या झाली, याबाबत साशंकता आहे.

वाघाला असलेल्या महत्त्वामुळे व्याघ्र प्रकल्पादी संरक्षित क्षेत्रातील क्षेत्रीय कर्मचाऱ्यांच्या गरजांकडे वन विभागाचे तुलनेने अधिक लक्ष असते. ह्या कर्मचाऱ्यांना काही प्रमाणात स्वयंसेवी संस्था, उद्योग-व्यवसायांच्या सामाजिक दायित्व निधीतून मदत मिळते. वन विभागाच्या प्रादेशिक अंतर्गत येणाऱ्या वनांमधील क्षेत्रीय कर्मचारी त्या कर्मचाऱ्यांच्या तुलनेत दुर्लक्षित राहतात.

भारतातील क्षेत्रीय कर्मचाऱ्यांची परिस्थिती जगजाहीर आहे. आर्थिक महासत्ता बनू पाहणारा आपला देश क्षेत्रीय वनकर्मचाऱ्यांसाठी जगातील सर्वाधिक धोकादायक असल्याचे निरीक्षण 'इंटरनॅशनल रेंजर फेडरेशनने' नोंदवले आहे. वर्ष २०१२ ते २०१७ या कालावधीत जगभरात कार्यरत असताना मृत्युमुखी पडलेल्या दर तीन क्षेत्रीय कर्मचाऱ्यांमधील एक मृत्यू भारतात झाला आहे.

कामातील धोके टाळणे तुलनेने सोपे आहे; त्याबाबत उपाययोजना आदी मागण्या व त्यांचा पाठपुरावा 'इंडियन फॉरेस्ट सर्व्हिस असोसिएशन' करत आहे. प्रश्न आहे तो व्यवस्थेच्या असंवेदनशीलतेमुळे उभ्या राहणाऱ्या आव्हानांचा.

## संरक्षित क्षेत्रातील बातम्या

### कारंजा सोहोळ अभयारण्य

**कारंजा सोहोळ अभयारण्यात वाघाच्या उपस्थितीमुळे नवा संचारमार्ग प्रकाशात**

कारंजा सोहोळ अभयारण्यासह अकोला महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचा परिसर आणि खामगावात वाघाचा वावर दिसून आल्यामुळे वाघांच्या नव्या संचारमार्गावर शिक्कामोर्तब झाले आहे. वाघांचे अनेक संचारमार्ग 'वाइल्डलाईफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया' (WII) ने ओळखले आहेत. मात्र, वन्य प्राण्यांच्या हालचाली नसल्याने काही संचारमार्ग दिसून आले नव्हते ते आता वाघाच्या स्थलांतरामुळे नव्याने समोर येत आहेत. राज्यातील अनेक संचारमार्गांमध्ये मोठ्या प्रमाणात शेती असून काही वनजमिनीतून गेले आहेत.

संचारमार्गांची नव्याने ओळख, प्रभावी वन्यजीव व्यवस्थापन, संचारमार्गातील गावांसाठी लोकहिताच्या योजना आणि जनजागृती यावर भर देणे गरजेचे आहे, असे मत राज्य वन्यजीव मंडळाचे सदस्य यादव तरटे पाटील यांनी व्यक्त केले.

अकोला, खामगावसह कारंजा सोहोळसारख्या अभयारण्यात वाघाचे येणे ही नव्या संचारमार्गाची नांदी आहे. म्हणून WII ला त्याचा अभ्यास करण्यास सांगितले आहे, अशी माहिती राज्याचे प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांनी दिली.

**सूत्र -** 'वन्यजीवांच्या नव्या संचारमार्गांच्या स्वतंत्र व्यवस्थापनाची गरज', www.loksatta.com, ०९.१२.२०२१.



### ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प

**ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातील रानतळोधी गावाच्या पुनर्वसनास न्यायालयाची मंजुरी**

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातील कोळसा वनपरिक्षेत्रातील रानतळोधी ह्या गावाचे प्रकल्पाबाहेर पुनर्वसन करण्यास सर्वोच्च न्यायालयाने मंजुरी दिली आहे. ह्या पुनर्वसनामुळे ताडोबा प्रकल्पात १७५.२६ हेक्टर क्षेत्राची भर पडणार आहे. रानतळोधीपाठोपाठ लगतच्या कारवा गावाच्याही पुनर्वसनाची प्रक्रिया सुरू आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या सेंट्रल एम्पॉवर्ड कमिटी (CEC) ने आक्षेप घेतल्यामुळे रानतळोधी गावाच्या पुनर्वसनाला विलंब होत होता. चंद्रपूर जिल्ह्यातील कंपार्टमेंट क्रमांक १४ बी मध्ये ३७५ हेक्टर जागेवर पुनर्वसनासाठी रानतळोधीचे रहिवासी स्वेच्छेने तयार झाले. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने २८ जानेवारी २०१९ रोजी दिलेल्या आदेशानुसार, पुनर्वसनामुळे रिक्त झालेल्या जागेएवढीच जागा गावाला पुनर्वसनासाठी दिली जावी, ह्या आदेशाचा संदर्भ देऊन केंद्र सरकारच्या फॉरेस्ट एडव्हायझरी कमिटीने आक्षेप घेतला. रानतळोधी गावाच्या पुनर्वसनासाठी ३७५ हेक्टर जागा आणि पुनर्वसनामुळे ताडोबा प्रकल्पात मात्र केवळ १७५ हेक्टरची भर असा मुद्दा समितीने मांडला.

राज्याच्या मुख्य वन्यजीव रक्षकांनी ७ मे २०२१ रोजी CEC समोर महाराष्ट्राची बाजू मांडली. त्यानंतर समितीने केलेल्या शिफारसी लक्षात घेऊन सर्वोच्च न्यायालयाने रानतळोधी गावाच्या बाजूने निकाल दिला. गावातील १४५ कुटुंबांना केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाकडून आवश्यक परवानगी घेऊन ३७५ हेक्टर जमिनीच्या वनेतर वापराची परवानगी देण्याचा आदेश न्यायालयाने दिला.

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या क्षेत्र संचालकांनी सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचे स्वागत केले आहे. व्याघ्र प्रकल्पात तुलनेने कमी क्षेत्राची भर पडणार

असली तरी रानतळोधी गावातील मानवी व्यवहारांचा प्रभाव पाच कंपार्टमेंटमध्ये पसरलेला होता याकडे त्यांनी लक्ष वेधले आहे.

गावातील २४४ कुटुंबांपैकी १४५ कुटुंबांनी सरकारकडून पुनर्वसनाचा पर्याय निवडला आहे; तर ९९ कुटुंबांनी सरकारकडून पुनर्वसनाऐवजी केवळ रोख रक्कम घेऊन बाहेर पडण्याचा पर्याय निवडला आहे.

**सूत्र** – विजय पिंजरकर. 'SC paves way for Rantalodhi relocation, tigers get more space in Tadoba', www.timesofindia.indiatimes.com, १७.१२.२०२१.

## ताडोबासह गडचिरोलीतील पाळीव हत्ती गुजरातेत पाठवण्याचा वन विभागाचा निर्णय

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प आणि गडचिरोली जिल्ह्यात असलेले किमान १२ पाळीव हत्ती गुजरातमध्ये पाठवण्याचा निर्णय महाराष्ट्र वन विभागाने घेतला आहे. 'रिलायन्स' उद्योगसमूहाच्या जामनगर इथल्या 'ग्रीन्स झुलॉजिकल रेस्क्यू ऐण्ड रिहॅबिलिटेशन किंगडम'मध्ये हे हत्ती ठेवले जाणार आहेत.

गुजरातेत जामनगरजवळ मोती खावडी इथे रिलायन्स तेलशुद्धीकरण प्रकल्पाजवळ २८० एकर जागेवर रिलायन्सचे प्राणिसंग्रहालय उभारण्यात येत आहे. नोव्हेंबर २०२१ मध्ये गडचिरोली जिल्ह्यातील हेमलकसा इथे डॉ. प्रकाश आमटे यांनी बाळगलेली तीन अस्वले व एक बिबट्या वन विभाग आणि केंद्रीय प्राणिसंग्रहालय प्राधिकरणाच्या परवानगीने जामनगरला पाठवण्यात आले.

राज्याच्या प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांनी दिलेल्या माहितीनुसार, पहिल्या टप्प्यात ताडोबातील बोटेझरी छावणीतील सगळे सहा हत्ती, दुसऱ्या टप्प्यात गडचिरोलीतील आलापल्ली इथल्या पातानीलमधील तीन आणि सिरोंचा वन विभागातील कमलापूर इथले तीन असे सहा हत्ती पाठवण्याचा बेत आहे.


डिसेंबर २०२१ अखेरीस व जानेवारी २०२२ मध्ये हे हत्ती पाठवण्याचा वन विभागाचा बेत असल्याचे वृत्तात म्हटले आहे. मात्र, प्रस्तुत अंक प्रकाशनासाठी गेला तोवर ह्याबाबत अधिक वृत्त हाती आले नव्हते.

राज्याच्या वन विभागाचे विदर्भात २० पाळीव हत्ती आहेत. त्यातील कमलापूर इथे सात, पातानील इथे तीन, ताडोबा इथे सहा आणि मेळघाटात चार हत्ती आहेत.

वन विभागाच्या पाळीव हत्ती पाठवण्याच्या निर्णयाबाबत प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांनी सांगितले की ह्या पाळीव हत्तींकडून आता कोणतीही कामे करवून घेतली जात नाहीत. मात्र, त्यांच्या देखभालीचा खर्च प्रचंड आहे. खेरीज, ताडोबा इथे एका कर्मचाऱ्याला हत्तीने ठार केले; तेव्हापासून ताडोबा प्रकल्पाचे व्यवस्थापन हत्तींची इतरत्र सोय करण्याच्या विचारात होतेच. आता केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाने परवानगी दिली आहे त्यामुळे ह्या पाळीव हत्तींना गुजरातेत पाठवले जाणार आहे.

वन विभागाच्या पाळीव हत्तींबाबतच्या ह्या निर्णयाला वनाधिकारी आणि मानद वन्यजीव रक्षकांनी पाठिंबा दर्शवला आहे. मात्र, कमलापूर इथल्या स्थानिक जनतेने या निर्णयाबाबत नापसंती दर्शवली आहे. ह्या पाळीव हत्तींना पाहण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांमुळे स्थानिकांना प्रत्यक्ष, अप्रत्यक्षरित्या मिळणारा रोजगार बंद होईल, असे स्थानिकांचे म्हणणे आहे (*संबंधित वृत्त पान क्र. १५*).

**सूत्र** – विजय पिंजरकर. 'Tadoba, Gadchiroli tuskers to be shifted to Reliance centre in Gujarat', www.timesofindia.indiatimes.com, १८.१२.२०२१.
संजना भालेराव. 'Jamnagar zoo to get 13 elephants from a camp in Gadchiroli', indianexpress.com, ०३.०१.२०२२.



**ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात वाघाच्या हल्ल्यात वनरक्षकाचा मृत्यू**

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातील कोलारा वनपरिक्षेत्रात नोव्हेंबर महिन्यात व्याघ्रगणनेच्या कामादरम्यान एका वाघिणीने केलेल्या हल्ल्यात महिला वनरक्षकाचा मृत्यू झाला. स्वाती ढुमने (वय ४३) असे त्या वनरक्षकाचे नाव आहे.

कोलारा गेट इथे गाभा क्षेत्रात छेदरेषा आखण्याचे काम सुरू असताना वनरक्षक ढुमने यांच्यावर माया नावाच्या वाघिणीने हल्ला केला. सोबत असलेल्या चार वनमजुरांनी वाघाला हुसकावण्याचा प्रयत्न केला. मात्र वाघाने ढुमने यांना ओढून दाट जंगलात नेले. या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी ताडोबा व्यवस्थापनाचे अधिकारी व कर्मचारी तातडीने रवाना झाले व शोधमोहीम राबवली गेली. त्या मोहिमेत ढुमने यांचा मृतदेह सापडला.

**सूत्र** – 'ताडोबामध्ये धक्कादायक घटना! वाघिणीच्या हल्ल्यात महिला वनरक्षक ठार', maharashtratimes.com, २०.११.२०२१.

**पर्यटनासाठी ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात बंदिस्त वाहने**

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात पर्यटनासाठी बंदिस्त वाहने वापरण्याच्या दृष्टीने व्यवस्थापनाने सफारी जिप्सी वाहनांवरील सुरक्षाकवचाची रेखांकने उत्पादक, अभियंता आदी संबंधितांकडून मागवली आहेत.

भारतात पावसाळा वगळता नऊ महिने दररोज दोन ते तीन हजार जिप्सी पर्यटकांना वन्यजीव सफारीसाठी घेऊन फिरतात. मात्र, गेल्या तीन-चार दशकात कोणत्याही व्याघ्र प्रकल्पात वाघाने किंवा मांसभक्षी प्राण्याने जिप्सीतील पर्यटकांवर हल्ला केल्याच्या आणि त्यात पर्यटक जखमी, मृत्युमुखी पडल्याच्या घटना घडलेल्या नाहीत. वाघ जिप्सीजवळ येण्याचा प्रकार ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात बरेचदा घडला आहे. दोन वर्षांपूर्वी ह्या व्याघ्र प्रकल्पात वाघ जिप्सीवर हल्ल्याच्या पवित्र्यात असल्याचे चलतचित्रण समाजमाध्यमांवर प्रसारित झाले होते. त्यानंतर उमरेड कऱ्हांडला अभयारण्यातही वाघ जिप्सीचा आरसा चाटतानाचे चलतचित्रण समोर आले होते. या प्रकारांना पर्यटकांसह जिप्सीचालक, पर्यटक मार्गदर्शक यांच्याकडून होणारे नियमांचे उल्लंघन कारणीभूत ठरल्याचे दिसून आले आहे.

मात्र, अलीकडे व्याघ्रगणनेदरम्यान वाघाच्या हल्ल्यात एक महिला वनरक्षक मृत्युमुखी पडल्यानंतर ताडोबा व्यवस्थापनाने वन्यजीव सफारी अधिक सुरक्षित करण्यासाठी व्यवस्थापनाने सुरक्षाकवच असलेली वाहने वापरण्याचे ठरवले आहे. सर्वोत्कृष्ट रेखांकनाला २५ हजार रुपयांचे पारितोषिक दिले जाणार असून त्यानुसार बनवलेले सुरक्षाकवच जिप्सीसह इतर वाहनांवर बसवण्यासाठी व्यवस्थापन मंजुरी देईल. रेखांकनांच्या निवड समितीकडून परीक्षणासाठी २० डिसेंबर ही तारीख निश्चित करण्यात आली होती. दरम्यान, या बाबतचे पुढील वृत्तांकन आढळले नाही.

**सूत्र** – 'ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातील पर्यटक वाहन आता बंदिस्त', www.loksatta.com, ०१.१२.२०२१.

**ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या क्षेत्र संचालकांची कार्यकाळ पूर्ण होण्यापूर्वी बदली**

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या क्षेत्र संचालक पदावरून डॉ. जितेंद्र रामगावकर यांचा कार्यकाळ पूर्ण होण्याआधीच त्यांची मंत्रालयात बदली करण्यात आली आहे.

ही बाब व्याघ्र प्रकल्पाच्या एकूणच व्यापक नियोजन व व्यवस्थापनाच्या दृष्टीने हितावह नाही. तसेच, ह्या बदलीमुळे त्रिपक्षीय सामंजस्य करारासह नागरी सेवा बदली संदर्भातील अधिनियमाचे देखील उल्लंघन होत आहे. तेव्हा ह्या निर्णयाचा पुनर्विचार व्हावा म्हणून मुख्यमंत्र्यांना निवेदन पाठवल्याचे राज्य वन्यजीव मंडळाच्या सदस्याने सांगितले.

राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण, राज्य सरकार आणि ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प क्षेत्र संचालक यांच्यात ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या उत्कृष्ट व्यवस्थापनाकरिता त्रिपक्षीय सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारात वन्यजीव क्षेत्रात काम करणाऱ्या अभ्यासू व प्रशिक्षित अधिकाऱ्यांची किमान तीन वर्षांच्या कार्यकाळासह नियुक्ती केली जाईल. गरज पडल्यास हा कालावधी आणखी वाढवला जाईल, पण तो कमी करण्यात येणार नाही, असे नमूद केले आहे. असे असताना मंत्रालयातील एक अधिकारी सेवानिवृत्त होत असल्याने त्यांच्या जागेवर चांगला अधिकारी हवा म्हणून डॉ. रामगावकर यांची बदली मंत्रालयात करण्यात आली.

**सूत्र** - 'त्रिपक्षीय सामंजस्य कराराचे राज्यशासनाकडूनच उल्लंघन!', www.loksatta.com, २७.१०.२०२१.

## पेंच व्याघ्र प्रकल्प

### पेंच व्याघ्र प्रकल्पातील वाघिणीचा मृत्यू विषबाधेमुळे झाल्याचा अंदाज

पेंच व्याघ्र प्रकल्पातील सालेघाट वन परिक्षेत्रातील पाथरी नियतक्षेत्रात कंपार्टमेंट क्रमांक ६३५ मध्ये पाच ते सहा वर्षे वयोगटातील टी-३५ नावाची वाघीण मृतावस्थेत आढळून आली. सर्व शारीरिक सुस्थितीत असल्याने शिकार झाली नसल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला होता. मात्र, शवविच्छेदनात ह्या वाघिणीचा मृत्यू विषबाधेमुळे झाल्याची शक्यता दिसून आली आहे. तिच्या व्हिसेऱ्याचा नमुना प्रादेशिक न्यायवैद्यक विज्ञान प्रयोगशाळेत पाठवण्यात आला आहे. प्रयोगशाळेकडून मिळालेल्या अहवालानंतर मृत्यूच्या कारणावर शिक्कामोर्तब करण्यात येईल, असे पेंच व्याघ्र प्रकल्पाच्या क्षेत्र संचालकांनी सांगितले.

मृत वाघिणीच्या अंदाजे ११ महिन्यांच्या दोन बछड्यांसाठी शोधमोहीम सुरु असून त्यासाठी ६० स्वयंचलित कॅमेरे लावण्यात आले आहेत. वाघिणीचा मृतदेह सापडलेल्या संपूर्ण परिसरात कसून शोध मोहीम राबवली जात आहे. त्यासाठी विशेष व्याघ्र संरक्षण दलाच्या कर्मचाऱ्यांसह चार पथके तैनात करण्यात आली आहेत.

**सूत्र** - राजेश रामपूरकर. 'पेंचमधील वाघिणीचा मृत्यू विषबाधेनेच', www.esakal.com, ०६.०१.२०२२.


## महेंद्री संवर्धन राखीव

### महेंद्रीच्या जंगलाला अभयारण्याचा दर्जा देण्याची सात गावांची मागणी

अमरावती जिल्ह्यात वरुड तालुक्यात असलेल्या महेंद्रीच्या जंगलाला अभयारण्याचा दर्जा देण्यात यावा, अशी मागणी त्या क्षेत्रातील सात गावांनी ठराव घेऊन केली आहे. ही मागणी लावून धरण्यासाठी त्यांनी कृती समितीही स्थापन केली आहे. राज्य वन्यजीव मंडळाच्या ऑक्टोबर २०२१ मध्ये झालेल्या १७व्या बैठकीत गावकऱ्यांच्या मागणीची दखल घेण्यात आली असून पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांनी ह्याबाबत प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश वन विभागाला दिले आहेत.

राज्य वन्यजीव मंडळाच्या ऑगस्ट २०२० मध्ये झालेल्या १५व्या बैठकीत राज्य वन्यजीव मंडळाच्या एका सदस्याने महेंद्रीला अभयारण्याचा दर्जा देण्याबाबत प्रस्ताव सादर केला. त्यानंतर मंडळाचे अध्यक्ष व मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी याबाबत प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश वन विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले होते. मात्र, प्रादेशिक विभागाने नकारात्मक आणि वन्यजीव विभागाने सकारात्मक असे परस्परविरोधी प्रस्ताव सादर केले. परिणामी, डिसेंबर २०२० मध्ये झालेल्या मंडळाच्या १६व्या बैठकीत महेंद्रीला अभयारण्याच्या दर्जाऐवजी संवर्धन राखीवचा दर्जा देण्यात आला. तेव्हा, २०२१ मध्ये फेब्रुवारी-मार्च महिन्यापासून गावकऱ्यांनी अभयारण्यासाठी आंदोलन सुरू केले. महेंद्री आणि मध्य प्रदेशच्या सीमेवरील मध्य प्रदेशातील पेडोली गावाचा देखील अभयारण्याच्या मागणीला पाठिंबा आहे. महेंद्रीच्या जंगलाचे क्षेत्र सुमारे ६७ चौरस किमी. असून ह्या जंगलात वाघांच्या प्रजननाच्या नोंदी आहेत. तसेच, मेळघाट, पेंच, सातपुडा व्याघ्र

अधिवासांना जोडणारा हा संचारमार्ग व्याघ्रसंवर्धनासाठी महत्त्वाचा आहे.




**सूत्र** - 'महेंद्री जंगलाला अभयारण्याचा दर्जा द्या', www.loksatta.com, २३.१०.२०२१.

## राज्यस्तरीय बातम्या

### वन्य प्राण्यांचे रस्ते व रेल्वे मार्गावरील अपघाती मृत्यू टाळण्यासाठी केंद्राकडे पाठपुरावा करण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश

व्याघ्र प्रकल्पांलगतच्या राष्ट्रीय महामार्गांवर त्रोटक पद्धतीने बांधलेल्या दुभाजकांमुळे वाघांसह इतरही वन्य प्राण्यांना अपघाती मृत्यूला सामोरे जावे लागत आहे. हे अपघात टाळण्यासाठी केंद्र सरकारच्या संबंधित यंत्रणेला तात्काळ सांगून त्याचा पाठपुरावा करावा आणि वन्य प्राण्यांचा मार्ग मोकळा करावा, अशा सूचना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी राज्य वन्यजीव मंडळाच्या अखत्यारितील व्याघ्र संवर्धन नियामक मंडळाच्या ऑक्टोबर अखेरीस मुंबईत झालेल्या बैठकीत वन विभागाच्या अधिकाऱ्यांना केल्या.

रेल्वे मार्गावरील अपघातांच्या मागील कारणांचा शोध घेऊन अपघात टाळण्यासाठीही प्रयत्न करावे, असे मुख्यमंत्री म्हणाले. पर्यटनाला चालना देण्यासाठी अंतर्गत रस्त्यांची कामे दर्जेदार करावीत. राज्यातील व्याघ्र प्रकल्प क्षेत्रांचे व्यवस्थापन तसेच वाघ आणि अन्य वन्यजीवांसह संपूर्ण जैवविविधतेचे संवर्धन करताना जंगलावर अवलंबून असणाऱ्या स्थानिकांना रोजगार उपलब्ध व्हावा, ह्यासाठी विविध विभागांच्या योजनांची सांगड घालण्यात यावी, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले.

बैठकीत मेळघाट, नवेगाव नागझिरा, ताडोबा अंधारी, सह्याद्री, पेंच, बोर या व्याघ्र प्रकल्पांच्या संचालकांनी प्रकल्पांच्या वाटचालीचा आढावा घेतला आणि आर्थिक बाबींची माहिती सादर केली.

**सूत्र** – झियाउद्दीन सय्यद. 'राष्ट्रीय महामार्गावरील चुकीचे दुभाजक वन्यप्राण्यांसाठी घातक; केंद्रीय यंत्रणांकडे पाठपुरावा करा, मुख्यमंत्र्यांचे निर्देश', www.loksatta.com, २३.१०.२०२१.

### वनगुन्ह्यांच्या तपासात पोलिसांना महत्त्वाची भूमिका देण्याचा राज्याच्या टायव्याघ्र कक्ष समितीचा निर्णय

वन्यजीव गुन्हे आणि माणूस-वन्यजीव संघर्षाच्या पार्श्वभूमीवर स्थापन करण्यात आलेल्या व्याघ्र कक्ष समितीची तब्बल १० महिन्यांनंतर डिसेंबर २०२१ च्या सुरुवातीला बैठक झाली. ह्या बैठकीत अनेक मुद्द्यांवर चर्चा झाली. त्यामध्ये वनगुन्ह्यांच्या तपासात पोलीस खात्यातील अधिकाऱ्यांना महत्त्वाची भूमिका देण्याचे ठरले. त्यासाठी दोन्ही खात्यांतील अधिकारी, कर्मचाऱ्यांना एकत्रित प्रशिक्षण दिले जाणार आहे. आतापर्यंत गुन्हा नोंदवण्यापासून ते आरोपींना न्यायालयात नेण्यापर्यंत आतापर्यंत वन खात्याचेच अधिकारी संपूर्ण प्रकरण हाताळत होते.

पेंच व्याघ्र प्रकल्पातील अवैध मासेमारीचा विषय गंभीर असल्याने त्यासाठी पोलीस महासंचालक, पोलीस महानिरीक्षक पातळीवर देखील समन्वय साधला जाईल. माणूस-वन्यजीव संघर्षाप्रसंगी जमावाला आवर घालणे कठीण होते. अशा प्रसंगी पोलिसांच्या मदतीसाठी कागदोपत्री कारवाईत वेळ जात असल्याने आता त्याची

प्रतीक्षा न करता मदतीसाठी पोलीस तात्काळ रवाना होतील, असा निर्णय ह्या बैठकीत घेण्यात आला.

दरम्यान, व्याघ्र कक्ष समितीच्या बैठकीला शासन आदेशानुसार समितीचे अध्यक्ष, सदस्य सचिव, उपवनसंरक्षक, रेल्वे, महामार्ग प्राधिकरणाचे अधिकारी आणि निमंत्रितांसह दहा ते बारा जणांनाच उपस्थित राहण्याची परवानगी असते. मात्र, या खेपेला बैठकीत वन खात्यातील सहाय्यक वनसंरक्षकांपासून ते विविध वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांची रांग लागली होती; तीन मानद वन्यजीव रक्षकांसह स्वयंसेवी संस्थेचा कार्यकर्तादेखील बैठकीला उपस्थित होता.



**सूत्र** - 'तब्बल दहा महिन्यानंतर 'व्याघ्र कक्ष समिती'ची सकारात्मक बैठक', www.loksatta.com, ०९.१२.२०२१.

### जिल्हा व विभागस्तरीय व्याघ्र कक्ष समित्यांच्या त्रैमासिक बैठका वर्षभर लांबणीवर

राज्यातील जिल्हा आणि विभागस्तरीय व्याघ्र कक्ष समित्यांच्या दर तीन महिन्यांनी अपेक्षित असलेल्या बैठका वर्ष उलटून गेले तरी झालेल्या नाहीत.

राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये जिल्हास्तरीय व्याघ्र कक्ष समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. जिल्हा पोलीस अधीक्षक (ग्रामीण) यांच्या अध्यक्षतेखालील ह्या समितीमध्ये वन्यजीवांच्या शिकारी रोखण्याच्या हेतूने महावितरण, सिंचन, रेल्वे अशा सर्वच विभागांतील अधिकाऱ्यांचा समावेश आहे. सर्व विभागांमध्ये समन्वय तसेच वन्यजीव गुन्हे रोखण्याबाबत आढावा घेण्यासाठी दर तीन महिन्यांनी समितीची बैठक घेतली जाणे अपेक्षित आहे. मात्र, गेल्या वर्षभरापासून अनेक जिल्ह्यांमध्ये ह्या बैठका झालेल्या नाहीत. त्यापूर्वीही वर्षांतून कधीतरी होणाऱ्या बैठकांमध्ये संबंधित विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनीच दांडी मारण्याचे धोरण अवलंबल्याने या समित्यांचे गांभीर्य हरवले आहे.

नागपूर हे वन खात्याचे मुख्यालय असताना या जिल्ह्यातही वर्षभरात समितीच्या बैठका झाल्या नाहीत. पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांनी राज्य वन्यजीव मंडळाच्या सदस्यांसोबत साधलेल्या संवादात राज्य वन्यजीव मंडळाचे सदस्य कुंदन हाते यांनी ह्याबाबतचा मुद्दा उपस्थित केला होता. माणूस-वन्यजीव संघर्षाप्रसंगी कायदा व सुव्यवस्था सांभाळण्याची जबाबदारी ह्या समित्यांवर असते. मात्र, बैठकांचेही गांभीर्य नसताना असे प्रसंग कसे हाताळणार, असा प्रश्न यावेळी उपस्थित करण्यात आला. शिकार रोखण्यासाठी, संघर्ष प्रसंगांची हाताळणी करण्याकरता विविध विभागांत समन्वय असावा, हा व्याघ्र कक्ष समिती स्थापण्यामागचा उद्देशच हरवल्याचे हाते यांनी सांगितले. या चर्चेची पर्यावरण मंत्र्यांनी गांभीर्याने नोंद घेतली आणि सर्व जिल्ह्यांतील समिती अध्यक्षांना पत्र लिहून बैठकांबाबत अद्ययावत माहिती देण्याचे निर्देश त्यांनी दिले.

दरम्यान, ह्याबाबत राज्यातील सर्व जिल्हास्तरीय समिती अध्यक्षांना पर्यावरण मंत्र्यांच्या निर्देशांपूर्वीच समिती अद्ययावत करण्याबाबत तसेच बैठकांबाबत पत्र देण्यात आल्याचे वन खात्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले.

**सूत्र** – 'व्याघ्र कक्ष समितीचे गांभीर्य हरपले', www.loksatta.com, १७.११.२०२१.

### राज्यात वन्यजीव गुन्हे कक्षाची उभारणी; राज्यासाठी वन्यजीव अपराध नियंत्रण शाखेची वन्यजीव मंडळाच्या सदस्याची मागणी

वन्यजीवांच्या शिकारी व त्यांच्या अवयवांची तस्करी रोखण्यासाठी केरळच्या धर्तीवर महाराष्ट्रात वन्यजीव गुन्ह्यांच्या तपासासाठी कक्ष उभारला जात आहे. त्यासोबत राज्यात वन्यजीव गुन्ह्यांना प्रतिबंध करण्यासाठी

स्वतंत्र वन्यजीव अपराध नियंत्रण शाखा असावी, अशी मागणी राज्य वन्यजीव मंडळाच्या सदस्यासह वन्यजीवप्रेमींनी केली आहे.

महाराष्ट्र राज्य वन्यजीव मंडळाच्या २०२० च्या अखेरीस झालेल्या बैठकीत केंद्रीय वन्यजीव गुन्हे नियंत्रण शाखेच्या धर्तीवर राज्यातही अशी शाखा स्थापन करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली होती. तत्पूर्वी २०१४ मध्ये केंद्राने राज्याला राज्यस्तरीय अपराध नियंत्रण शाखा स्थापन करण्याबाबत सूचना केली होती. महाराष्ट्रात ही शाखा स्थापन करण्याऐवजी केरळच्या धर्तीवर अत्याधुनिक सॉफ्टवेअरचा वापर करून वन्यजीव गुन्हे कक्ष तयार करण्यात येत आहे. या सॉफ्टवेअरमध्ये सुमारे दहा वर्षांपूर्वीची वन्यजीव गुन्हेगारीची प्रकरणे अंतर्भूत केली जाणार आहेत. वन्यजीव गुन्ह्यात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अधिकाऱ्यांची यासाठी निवड करण्यात आली आहे.

मात्र, कक्षामध्ये काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना त्यांचे नियमित काम करून वन्यजीव गुन्हे नियंत्रण कक्षाचे काम करायचे आहे. त्यामुळे त्याचा परिणाम गुन्ह्याच्या तपासावर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. खेरीज, न्यायालयीन कामकाज प्रभावी होण्याच्या दृष्टीने आणि कायद्याची कडक अंमलबजावणी होण्यासाठी पोलीस खात्याप्रमाणे स्वतंत्र गुन्हे शाखा असेल तर कामाची निश्चिती होऊन प्रकरणे त्वरित मार्गी लागतील, असा मतप्रवाह जाणकारांमध्ये आहे.

वन्यजीव गुन्हे कक्षाची मदत तर होणारच आहे, पण त्याचवेळी वन्यजीव गुन्हे अपराध नियंत्रण शाखा असेल तर प्रकरणांचा निकाल जलदगतीने लागेल. त्यामुळे महाराष्ट्रातही वन्यजीव गुन्हे अपराध नियंत्रण शाखा असावी, अशी मागणी राज्य वन्यजीव मंडळाच्या सदस्याने केली आहे.

**सूत्र** – 'वन्यजीव गुन्हे कक्षासह अपराध नियंत्रण शाखाही आवश्यक', www.loksatta.com, ०४.११.२०२१.

## व्याघ्रगणनेदरम्यान वनरक्षकाचा वाघाच्या हल्ल्यात मृत्यू; गणनेच्या प्रक्रियेतील त्रुटी उघड

राष्ट्रीय व्याघ्रगणनेदरम्यान चंद्रपूर जिल्ह्यातील ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात एक महिला वनरक्षक वाघाच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडली (*संबंधित वृत्त पान क्र.६*). ह्या घटनेमुळे व्याघ्रगणनेच्या प्रक्रियेतील त्रुटी समोर आल्या आहेत. ह्या घटनेनंतर प्रशासनाने व्याघ्रगणना काही कालावधीसाठी स्थगित करण्याचा निर्णय घेतला होता.

कर्तव्यावर असताना मृत्यू झालेल्या वनाधिकारी, कर्मचाऱ्यांना वनशहिदाचा दर्जा दिला जातो (मात्र पुढची कार्यवाही केली जात नाही) आणि खाते इथेच थांबते, असे म्हणून 'इंडियन फॉरेस्ट सर्व्हिस असोसिएशन'सह अन्य संघटनांनी अशा घटनांच्या संदर्भात शहिदांप्रति शासनाच्या कर्तव्याची जाण करून दिली आहे.

भारतात वन विभागात सुमारे ५०,००० क्षेत्रीय कर्मचारी असून दररोज सरासरी एक वनकर्मचारी जंगल आणि वन्यजीवांची सुरक्षा करताना, वन्यप्राण्यांसह संघर्षाच्या घटना किंवा तस्करांच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडतो. ह्या बाबत राष्ट्रीय धोरण आणि मार्गदर्शक तत्त्वे तयार केली जावीत ह्याकरता 'इंडियन फॉरेस्ट सर्व्हिस असोसिएशन'ने तत्कालीन केंद्रीय पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्री प्रकाश जावडेकर यांना पत्र दिले होते. वनशहिदांच्या कुटुंबीयांना पोलीस खात्याप्रमाणे आर्थिक मदत देण्याचा प्रस्ताव सप्टेंबर २०२० मध्ये राज्याच्या वन खात्याच्या प्रधान सचिवांना पाठवण्यात आला. मात्र, केंद्राकडे दिलेले पत्र आणि राज्याकडील प्रस्ताव हे दोन्ही धूळ खात पडले आहेत.

व्याघ्रगणनेसाठी कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले जाते पण त्या प्रशिक्षणात त्यांच्या सुरक्षेविषयी जागरूक केले जाते का, गणना करताना वन्य प्राणी अचानक समोर आल्यास स्वत:ची सुरक्षा कशी करायची, सुरक्षेसाठी गणनेदरम्यान लागणारी साधने या सर्व बाबी पुरवल्या जातात का, प्रत्यक्ष गणनास्थळी वरिष्ठ अधिकारी जातात का, असे अनेक प्रश्न या घटनेनंतर निर्माण झाले आहेत.

जंगलात आणि विशेषत: वाघाच्या अधिवासात फिरताना खाली बसू नये, जोरजोराने बोलत व काठी आपटत चालावे, एकटेदुकटे न जाता घोळक्याने किंवा सोबती घेऊन जावे इत्यादी ढोबळ नियम आहेत. हे नियम वनाधिकाऱ्यांना प्रशिक्षण व सेवाकाळात शिकवले जातात. मात्र, व्याघ्रगणनेच्या पूर्वतयारीत ह्या नियमांचे पुनश्च स्मरण करून देणे हे प्रशिक्षण देणाऱ्या अधिकाऱ्यांचे कर्तव्य आहे. वेळोवेळी या कर्मचाऱ्यांना अभिमुख करणे, अद्ययावत प्रशिक्षण या सर्व बाबीही आवश्यक असतात. मात्र प्रशिक्षणाचा भर हा गणनेदरम्यान केवळ गणना कशी करायची व माहिती कशी भरायची ह्या बाबींवरच अधिक असतो.

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाला दरवर्षी १५ ते १६ कोटी रुपयांचा महसूल प्राप्त होतो. त्यातील किमान एक कोटी रुपये या 'फ्रंटलाइन स्टाफ'च्या सुरक्षेवर नक्कीच खर्च केले जाऊ शकतात, असे वृत्तात म्हटले आहे. त्यांना घुंगराची काठी, मानेला सुरक्षाकवच, हातात टॉर्च अशी सुरक्षेची साधने देता येऊ शकतात, असे मत वृत्तात नोंदवले आहे.

**सूत्र** – राखी चव्हाण. 'व्याघ्र गणनेतील त्रुटी उघड; वाघाच्या हल्ल्यात महिला वनरक्षकाच्या मृत्युमुळे सुरक्षेचा मुद्दा चर्चेत', www.loksatta.com, २६.११.२०२१.

## विदर्भातून वाघांचे राज्यात इतरत्र स्थलांतर करण्यासाठी वन खात्याचे नियोजन



वाघाच्या संवर्धनासाठी स्थलांतराचा प्रयत्न अभ्यासपूर्ण व नियोजनबद्ध पद्धतीने करण्यासाठी वन खात्याचे नियोजन झाले असून पहिल्या टप्प्यात नागझिरा अभयारण्य, दुसऱ्या टप्प्यात नवेगाव अभयारण्य आणि तिसऱ्या टप्प्यात सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात वाघांना स्थलांतरित करण्यात येणार आहे, अशी माहिती राज्याचे प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) सुनील लिमये यांनी दिली.

लिमये यांनी सांगितले की ब्रम्हपुरीत सध्या ८० ते ९० वाघ आहेत. त्यातील ६० ते ६५ मोठे आणि २५ ते ३० बछडे आहेत. या वाघांवर 'वाइल्डलाईफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया' (WII) चे शास्त्रज्ञ लक्ष ठेवून आहेत. ह्या पूर्वी सरिस्का व बांधवगडमध्ये पूर्ण वाढ झालेले वाघ स्थलांतरित करण्यात आले होते. महाराष्ट्रात मात्र आईपासून नुकत्याच वेगळ्या झालेल्या वाघांचे स्थलांतर करण्यात येणार आहे.

नागझिऱ्यात मादी वाघ कमी आहेत त्यामुळे इथे मादी बछड्यांना सोडल्यास त्यांना सहज हद्द प्रस्थापित करता येऊ शकेल.

दुसऱ्या टप्प्यात नवेगाव अभयारण्यात वाघांच्या स्थलांतरासाठी वाघांना आवश्यक खाद्य उपलब्ध करून देण्यासह त्यांचा अधिवास विकसित करण्यात येणार आहे. त्यानंतर तिथे वाघांचे स्थलांतर करण्यात येईल.

तिसऱ्या टप्प्यात सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात वाघांचे संवर्धन स्थलांतर करण्यात येईल. मात्र, हे स्थलांतर आव्हानात्मक आहे. WII च्या शास्त्रज्ञांनी मध्य भारतातील वाघ तिथे स्थिरावणार नाहीत, अशी शक्यता व्यक्त केली आहे. मात्र, मध्य भारतातील वाघ भारताच्या कानाकोपऱ्यात स्थिरावले आहेत. त्यामुळे हा प्रयत्न करण्यास हरकत नाही, असे लिमये यांचे मत आहे. त्यांनी सांगितले की हे स्थलांतर करण्यासाठी योजना तयार आहे. कात्रज आणि सागरेश्वर इथल्या प्राणिसंग्रहालयातील चितळ चांदोलीत १६ एकरावरील खुल्या पिंजऱ्यात सोडण्यात येतील. सुमारे वर्षभरानंतर तिथे चितळ आणि सांबरांची संख्या वाढली की अतिरिक्त चितळ आणि सांबर सह्याद्रीच्या जंगलात सोडण्यात येतील.त्यानंतर ह्या ठिकाणी नर आणि मादी वाघाचे स्थलांतर करण्याचे नियोजन आहे.

दरम्यान, संशोधकांनी कर्नाटकातून वाघ आणून सोडण्याचा सल्ला दिला आहे. मात्र, महाराष्ट्रात वाघांची संख्या मोठी आहे आणि नियोजनबद्ध पद्धतीने स्थलांतर केले, तर यश नक्कीच येईल, असा विश्वास लिमये यांनी व्यक्त केला आहे.

**सूत्र** - 'वाघाच्या संवर्धन स्थलांतरणासाठी वन खात्याचे नियोजन', www.loksatta.com, ०२.११.२०२१.

**मृगया चिन्हांच्या जतनासाठी राज्यात नागपूर इथे मंजूर झालेल्या प्रयोगशाळेची उभारणी लांबणीवर**



भारतात संग्रही असलेली वन्यजीवांची मृगया चिन्हे - ट्रॉफीच्या संवर्धनासाठी नागपूर इथे प्रयोगशाळेची उभारणी होणे अपेक्षित आहे. त्यासाठी प्रयोगशाळेचा आराखडा, जागा आणि निधी अशी सगळी तयारी झाली असूनही प्रयोगशाळेची प्रत्यक्ष उभारणी मात्र वनाधिकाऱ्यांच्या इच्छाशक्तीअभावी लांबली आहे.

राज्याच्या वन खात्यातील विविध विभागांमध्ये सुमारे दोन ते तीन हजार मृगया चिन्हे आहेत. यात पूर्णावस्थेतील वाघ, बिबट तसेच कातडी, पंजे आणि गवे, हरणे आदी वन्य प्राण्यांची मृगया चिन्हे आहेत. भविष्यातील पिढ्यांना अभ्यास करता यावा ह्या दृष्टीने आणि वारसा म्हणूनही ही मृगया चिन्हे टिकवून ठेवण्यासाठी त्यांवर वैज्ञानिक प्रक्रिया करणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रयोगशाळेची गरज आहे.

लखनौ इथे असलेल्या 'नॅशनल रीसर्च लॅबोरेटोरी फॉर कॉन्झर्वेशन ऑफ कल्चरल प्रॉपर्टी' ह्या भारतातील सरकारी संस्थेत अनेक वर्षे काम केलेल्या लीना झिल्पे-हाते आणि ह्या संस्थेचे माजी संचालक डॉ. बी. आर. खरबडे यांनी नागपुरात या मृगया चिन्हांच्या जतनासाठी काम सुरू केले. वन खात्याने उपलब्ध करून दिलेल्या जागेत त्यांनी आतापर्यंत वाघ, बिबट, गवे अशा अनेक वन्यजीवांची मृगया चिन्हे वैज्ञानिक प्रक्रिया करून जतन केली आहेत. मात्र, पुरेशा जागेअभावी त्यांना हे काम करण्यात अडचणी येत आहेत.

राज्य सरकारने महाराष्ट्रात प्रयोगशाळा उभारण्याला मान्यता देताच प्रादेशिक वन खात्याचे तत्कालीन उपवनसंरक्षक जी. मल्लिकार्जुन यांनी प्रयोगशाळेचा आराखडा तयार करण्यापासून ते इतर प्रक्रिया पार पाडली. माजी प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) नितीन काकोडकर यांनी राज्यातील सर्व वनवृत्तांना पत्र पाठवून त्यांच्याकडे असलेल्या मृगया चिन्हांची माहिती मागितली. मात्र, अजूनही सामाजिक वनीकरण विभाग वगळता इतर कुणीही ही माहिती दिलेली नाही.

ह्या प्रयोगशाळेच्या उभारणीसाठी आठ ते दहा लाख रुपयांचा निधी उपलब्ध आहे. जागा तयार आहे व या प्रयोगशाळेचा आराखडा देखील मंजूर झाला आहे.

वन्यजीवांच्या मृगया चिन्हांच्या संदर्भात वर्ष २००४ मध्ये एक शासननिर्णय झाला. त्यानुसार सरकारी कार्यालये व खासगीरीत्या ज्यांच्याकडे ही मृगया चिन्हे आहेत, त्यांनी मालकी प्रमाणपत्र घ्यायचे होते. २००६ मध्ये वन्यजीव संरक्षण कायद्यात दुरुस्ती करण्यात आली. त्यानंतर वन खात्याने मालकी प्रमाणपत्र मिळवले, मात्र, खासगी मृगया चिन्हधारकांच्या मालकी प्रमाणपत्राविषयी अजूनही संभ्रमाची स्थिती आहे.


**सूत्र** – 'नागपुरातील वन्यजीव 'ट्रॉफी' संवर्धन प्रयोगशाळा अडगळीत', www.loksatta.com, १२.१०.२०२१.

## राज्यातील पहिली वन्यजीव जनुकीय तपासणी प्रयोगशाळा नागपुरात

राज्यातील पहिली वन्यजीव जनुकीय (डीएनए) तपासणी प्रयोगशाळा नागपुरात उभारण्यात आली आहे.

महाराष्ट्रात उघडकीस आलेल्या वाघ आणि बिबट्यांसह इतर वन्यजीवांच्या शिकारीच्या प्रकरणांचा तपास करताना त्यांच्या नमुन्यांच्या जनुकीय चाचणीसाठी राज्याला हैदराबाद आणि देहरादून इथल्या प्रयोगशाळांवर अवलंबून राहावे लागत होते. या दोन प्रयोगशाळांमध्ये वन्यजीवांच्या नमुन्यांच्या जनुकीय तपासणीसाठी मोठे शुल्क मोजावे लागते. खेरीज, तपासणीसाठी लांबलचक प्रतीक्षा यादी असते. त्यामुळे अहवाल येईपर्यंत एक वर्षाचा कालावधी देखील जातो. ह्या काळात हे नमुने खराब होण्याची शक्यता असते. त्यामुळे अपेक्षित परिणाम मिळण्याची शक्यता कमी होते. मात्र, नव्याने उभारण्यात आलेल्या प्रयोगशाळेमुळे या अडचणींवर मात करता येणार आहे. या प्रयोगशाळेत शेजारच्या राज्यांतील वन्यजीवांचे नमुने देखील तपासता येणार आहेत.

राज्यातील सहा व्याघ्र प्रकल्पांपैकी पाच व्याघ्र प्रकल्प आणि अनेक अभयारण्ये विदर्भात आहेत. वाघांच्या सर्वाधिक संख्येमुळे शिकारीचे प्रमाणही इथे अधिक आहे. अशा प्रकरणात गुन्ह्यांचा शोध लावण्यासाठी वन्य प्राण्यांची जनुकीय चाचणी उपयुक्त ठरते.



**सूत्र -** 'राज्यातील पहिली वन्यजीव डीएनए तपासणी प्रयोगशाळा नागपुरात', www.loksatta.com, १९.१०.२०२१.

## किशोर रिठे यांना 'महाराष्ट्राची गिरीशिखरे' पुरस्कार

वन्यजीव संवर्धनाच्या क्षेत्रातील गेल्या तीन दशकांतील योगदानासाठी किशोर रिठे यांना 'महाराष्ट्राची गिरीशिखरे' पुरस्काराने गौरवण्यात येणार आहे.

रिठे राज्य वन्यजीव मंडळाचे सदस्य आहेत. मूळचे संगणक अभियंता असलेल्या रिठे यांनी नेचर कॉन्झर्वेशन सोसायटी, अमरावती आणि सातपुडा फाउण्डेशन या संस्थांची स्थापना केली. ह्या संस्थांच्या माध्यमातून मध्य भारतातील संरक्षित क्षेत्रात वन्यजीव संवर्धन आणि संरक्षित क्षेत्रालगत राहणाऱ्या समुदायांच्या कल्याणासाठी रिठे कार्यरत आहेत.

**सूत्र -** ''Maharashtrachi Girishikhare' award for wildlife conservationist Kishor Rithe', www.timesofindia.indiatimes.com, १७.१२.२०२१.

## पश्चिम महाराष्ट्र

### सातारा जिल्ह्यातील कऱ्हाडमध्ये मुंगसांच्या केसांपासून बनवलेले रंगकामाचे ब्रश जप्त

सातारा जिल्ह्यातील कऱ्हाड व मलकापुरातील रंगकामाच्या साहित्याची विक्री करणाऱ्या पाच दुकानांवर वन विभागाने छापे घालून मुंगसाच्या केसांपासून बनवलेले ब्रश जप्त केले. ह्या कारवाईत वन विभागाला १७३५ ब्रश मिळाले. (पाहा *महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र, खंड १, अंक १, क्र. १*).

ह्या प्रकरणी पाच दुकानदारांना अटक करण्यात आली. उपवनसंरक्षक महादेव मोहिते यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक वनसंरक्षक महेश झांजुर्णे व पथकाने ही कारवाई केली.

**सूत्र -** सचिन शिंदे. 'कऱ्हाडला मुंगसाच्या केसांपासून बनवलेले १७३५ ब्रश जप्त', १५.१२.२०२१.

**सांगली जिल्ह्यात उसाच्या फडात गवे शिरताच बिबट्या बाहेर; सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर बाजारपेठेत गवा**

सांगली जिल्ह्यातील शिराळा शहरासह तालुक्यात बिबट्यापाठोपाठ आता गव्यांचा वावर वाढला आहे.

जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात एका दिवसात दोन ठिकाणी बारा गवे आढळून आले. जांभळेवाडीच्या नाळ व बामन उगळी परिसरात चार गवे ग्रामस्थांना दिसले. त्या ठिकाणाहून त्यांना लोकांनी सुजयनगर परिसरात हुसकावले. त्या गव्यांच्या वावराकडे ग्रामस्थ लक्ष ठेवून असताना गवे उसाच्या फडात घुसले आणि अचानक त्यातून बिबट्या बाहेर आला.

भागाईवाडी, भाटशिरगाव परिसरातही आठ गव्यांचा कळप दिसला. या दोन्ही ठिकाणी वनाधिकाऱ्यांनी भेट देऊन पाहणी केली.

सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर शहराच्या मुख्य बाजारपेठेत गवा आल्याची घटना समोर आली आहे. ३ जानेवारीच्या मध्यरात्री एक वाजता वाट चुकलेला रानगवा बाजारपेठेत आला. बस स्थानकापासून ते बाजारपेठेतून छत्रपती शिवाजी महाराज चौकातून खिंडीत आणि तिथून तो जंगलात परतला.

**सूत्र** – 'गवे घुसले उसात; बिबट्या आला बाहेर!', www.esakal.com, ०५.०१.२०२२.



**गव्याने मुक्काम केल्यामुळे सांगली बाजार समिती एक दिवस बंद; आर्थिक व्यवहार ठप्प**

सांगली जिल्ह्याचे मुख्यालय असलेल्या सांगली शहरातील बाजार समितीच्या आवारात गवा मुक्कामी राहिल्याने बाजार समिती डिसेंबर अखेरीस एक दिवस बंद ठेवावी लागली.

सांगली शहरात येण्यापूर्वी चार दिवस हा गवा अंकलखोप, डिग्रज, सांगलीवाडी परिसरात वास्तव्यास होता. तो आयर्विन पुलावरून बाजार समितीच्या आवारात आला आणि परतीची वाट सापडली नाही त्यामुळे तिथेच स्थिरावला. परिणामी बाजारपेठ बंद ठेवावी लागली आणि त्या दिवशी दहा कोटींचे व्यवहार ठप्प झाले.

अखेर २० तासांच्या अथक प्रयत्नानंतर कोणतीही इजा न होता बाजार समितीत अडकलेल्या ह्या गव्याची वन्य अधिवासात मुक्तता करण्यात वन विभागाला यश आले.

**सूत्र** – '२० तासांच्या प्रयत्नानंतर सांगलीत गव्याची सुटका', www.loksatta.com, ३०.१२.२०२१.

**कोल्हापूर शहर व परिसरात गव्यांच्या वाढत्या फेऱ्या; हल्ल्यांमध्ये युवक ठार व महिला जखमी**

कोल्हापूर शहर व अवतीभवतीच्या गावांमध्ये गवे दिसण्याच्या घटनांमध्ये वाढ होत आहे.


डिसेंबर २०२१च्या तिसऱ्या आठवड्यात कोल्हापूर शहराच्या मध्यवर्ती भागात दोन गवे शिरले होते; तर शहरालगतच्या गावांमध्ये पाचसहा गव्यांचा कळप फिरताना दिसून आला होता. पन्हाळा तालुक्यातील हरपवडे गावात तीन दिवस चिखलात रुतल्यामुळे अशक्तपणाने गव्याचा मृत्यू झाला.

भुयेवाडी इथे २१ वर्षीय तरुणाचा गव्याच्या हल्ल्यात मृत्यू झाला; तर सोन्याची शिरोळी ह्या गावात गव्याच्या हल्ल्यात ४५ वर्षीय महिला गंभीर जखमी झाली. मात्र, वेळीच वैद्यकिय उपचार मिळाल्याने तिचा जीव वाचला.

क्लेमेंट बेन, मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), यांनी सांगितले की ऊस, मका या पिकांकडे गवे आकर्षित होतात. राधानगरी, दाजीपूर, बोरबेत, विशाळगड, आंबा, गगनबावडा, भूदरगड, आजरा ह्या भागांतील जंगलात गवे आहेत. ही जंगले सलग नसल्यामुळे ह्या प्रदेशात भटकंती करताना गवे साहजिकच जंगलाबाहेर गावे, शेतांमध्ये येतात. हे लक्षात घेऊन वन विभाग जंगलालगतच्या पडीक जमिनींवर खास गव्यांसाठीच उपयुक्त खाद्यपिके लावण्याच्या बेतात आहे.

**सूत्र** – राहूल गायकवाड व संदीप दिघे. ‘Kolhapur: As bison count rises, more animals stray near cities, say experts’, www.timesofindia.indiatimes.com, १९.१२.२०२१.

**कोल्हापूर जिल्ह्यातील आजरा तालुक्यात व्याघ्रगणनेदरम्यान आढळल्या वाघाच्या अस्तित्त्वाच्या खुणा**



अखिल भारतीय व्याघ्र गणनेच्या अंतिम टप्प्यात कोल्हापूर जिल्ह्यातील आजरा तालुक्यात जंगल परिसरात वाघाच्या अस्तित्त्वाच्या खुणा मिळाल्या आहेत.

आजरा तालुक्यात सुमारे १७,००० हेक्टरवर जंगल पसरलेले आहे. हे जंगल सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी तालुक्यातील आंबोली इथे असलेल्या जंगलाशी संलग्न आहे. या प्रदेशात बिबटे, अस्वल, सांबर, भेकर, हत्ती आदी प्राणी आहेत.

आजरा तालुक्यात वाघाचे दर्शन पूर्वी झाल्याचे व गेल्या तीन वर्षांत जंगल परिसरात बैलांना ठार करण्याच्या घटना घडल्याचे वृत्तात नमूद केले आहे.

व्याघ्रगणनेला राज्यात १५ जानेवारी पासून सुरुवात झाली. यात वाघ व तृणभक्षक प्राण्यांची गणना करण्यात आली. तेव्हा भेकर, सांबर यांच्या खाणाखुणांसह वाघ व बिबट्याची विष्ठाही मिळाली आहे. गवे व हत्तीच्या पाऊलखुणा मिळाल्या आहेत.

**सूत्र** – ‘आजरा परिसरात वाघाचे अस्तित्व’, www.esakal.com, २०.०१.२०२२.

## विदर्भ

**कमलापूर वनपरिक्षेत्रातील हत्ती गुजरातेत पाठवण्याच्या निर्णयाला स्थानिकांचा विरोध**

गडचिरोली जिल्ह्यातील सिरोंचा वन विभागांतर्गत कमलापूर वनपरिक्षेत्रातील शासकीय हत्ती छावणीतील हत्ती गुजरातमधील जामनगर इथल्या खासगी प्राणिसंग्रहालयात पाठवण्याच्या निर्णयाविरोधात कायदेतज्ञ असीम सरोदे आणि बोधी रामटेके यांनी केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाला कायदेशीर नोटीस पाठवली आहे.

गडचिरोली जिल्ह्यातील हत्तींना रिलायन्स कंपनीच्या गुजरातमध्ये असलेल्या खासगी केंद्रात पाठवण्यात येत आहे. हे हत्तींचे स्थलांतरण प्राणिहक्कांविरोधात असून स्थानिकांच्या उपजीविकेवरसुद्धा गदा आणणारे आहे. या संदर्भात सात दिवसांत समाधानकारक उत्तर न आल्यास व स्थलांतर थांबवण्यासाठी मंत्रालयाने हालचाल न केल्यास उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात येईल, असे ह्या नोटीशीत म्हटले आहे.


अनेक वर्षांपासून कमलापूर, पातानील या ठिकाणी हत्तींचे वास्तव्य आहे. ह्या भागांत पूर्णपणे रमलेल्या हत्तींना खासगी संग्रहालयात पाठवल्यामुळे त्यांना मानसिक त्रासाला सामोरे जावे लागू शकते. संविधानातील अनुच्छेद २१ नुसार प्राण्यांनासुद्धा चांगले आणि सन्मानाने जीवन जगण्याचा अधिकार आहे. या अधिकारांचे उल्लंघन रोखण्यासाठी हे स्थलांतर रद्द करून हत्तींच्या देखभालीसाठी

त्या ठिकाणी रिक्त असलेली पदे भरावी, अशी मागणी नोटिशीत केली आहे. बचाव केंद्र किंवा प्राणिसंग्रहालयात अनाथ, दिव्यांग प्राण्यांना ठेवले जाते. कमलापूर इथले हत्ती सुदृढ आहेत. अशा प्राण्यांना जंगलातून बंदिस्त, बनावट ठिकाणी घेऊन जाणे हा प्राण्यांचा छळ आहे, ह्याकडे सरोदे व रामटेके यांनी लक्ष वेधले आहे.

कमलापूर इथल्या हत्तींची प्रकृती सतत बिघडत असते, त्यांना सांभाळायला योग्य कर्मचारीवर्ग नाही, हत्ती प्रशिक्षित नाहीत अशी कारणे देऊन स्थलांतर करण्यात येत आहे. पण, ह्या समस्यांवर स्थलांतर हा उपाय नाही. विविध कायदे व नियमावलीत शासकीय हत्ती छावणीच्या व्यवस्थापनासाठी नियम दिले आहेत. प्रत्येक छावणीत माहूत, प्रशिक्षक, वैद्यकीय अधिकारी असणे आवश्यक आहे. परंतु रिक्त असलेली पदे न भरता स्थलांतरण करणे चुकीचे आहे, असे नोटिशीत म्हटले आहे.

**सूत्र** - 'हत्तींची लढाई आता न्यायालयात', www.esakal.com, १८.०१.२०२२.

## गडचिरोली जिल्ह्यात ओदिशातून आला हत्तींचा कळप



ओदिशातून भरकटलेला सुमारे २३ हत्तींचा कळप छत्तीसगडमार्गे ऑक्टोबर २०२१ मध्ये गडचिरोली जिल्ह्यात आला. त्यानंतर हा कळप डिसेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात चंद्रपूर जिल्ह्याच्या सीमेवर आला आणि आता वन खात्याच्या समन्वय आणि व्यवस्थापनामुळे हे हत्ती गडचिरोलीत स्थिरावले आहेत.


ओदिशातून आलेल्या हत्तींनी सुरुवातीला पिकांचे नुकसान केले. मात्र, त्यानंतर कोणतीही अनुचित घटना घडली नाही. दक्षिण धानोरा परिक्षेत्रात कन्हारटोला, मुंजारकुंडी, सिसुर या गावालगतच्या १८०० हेक्टर क्षेत्रात साधारण २०-२१ हत्तींचा कळप आहे. आतापर्यंत एक लाख रुपयांपेक्षा अधिक नुकसानभरपाई वन खात्याने शेतकऱ्यांना दिली आहे. हत्तीमुळे कोणतेही नुकसान होऊ नये यासाठी जिल्हा व पोलीस प्रशासन वन खात्याला सहकार्य करत आहेत. स्वयंचलित कॅमेरे व ड्रोनचा वापर करून हत्तींच्या हालचालीवर लक्ष ठेवले जात आहे.

दीर्घकालीन उपायांसाठी नजीकच्या जंगलात पाण्याचे स्रोत तयार करणे, विविध रोपांची लागवड करणे, गावामध्ये प्राथमिक बचाव पथक तयार करणे आदी उपाययोजना करण्यात येत आहेत. गेल्या दोन महिन्यांपासून हत्तींनी हा अधिवास स्वीकारल्याने तो सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टीने लागणाऱ्या खर्चासाठी गडचिरोली उपवनसंरक्षकांनी १.४ कोटी रुपयांचा प्रस्ताव शासनाला सादर केला आहे.

गोंदिया व गडचिरोली जिल्ह्यांतील दरेकसा, राजोली, टिपागड, भामरागड हे भाग हत्तीचा अधिवास म्हणून उपयुक्त ठरू शकतात, असे जाणकारांचे म्हणणे आहे. गेल्या दोन वर्षांपासून जिल्ह्याच्या सीमेत कधी दोन तर कधी तीन हत्ती येत आहेत, पण शेकडो वर्षांनंतर विदर्भात एवढ्या मोठ्या संख्येने हत्ती आले आहेत.

**सूत्र** - राजेश रामपूरकर. 'शेकडो वर्षांनंतर विदर्भात रानटी हत्तीचा मुक्काम', www.esakal.com, २२.१२.२०२१.

## उमरेड शहरात वाघाचे दात व नखांसह पाच जणांना अटक



नागपूर वन विभागाने २३ नोव्हेंबर रोजी केलेल्या कारवाईत वाघाचे दात आणि नखांसह पाच आरोपींना अटक करण्यात आली.

उमरेड बस स्थानकाजवळ २३ नोव्हेंबरला वाघाच्या दातांची विक्री होणार असल्याची माहिती नागपूर वन विभागाला मिळाली. या माहितीच्या आधारे दक्षिण उमरेड वनपरिक्षेत्राच्या पथकाने सापळा रचून तीन आरोपींना अटक केली. त्यांच्या चौकशीतून आणखी काही नावे समोर आल्यानंतर मेळघाट सायबर गुन्हे विभागाच्या मदतीने अजून दोन आरोपींना अटक करण्यात आली. हे सर्व आरोपी चंद्रपूर जिल्ह्यातील नागभीड तालुक्यातील आहेत. ह्या आरोपींविरुद्ध वन्यजीव संरक्षण कायद्यांतर्गत वन गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

आरोपींमध्ये संयुक्त वन व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षाचा समावेश आहे.

**सूत्र** – 'वाघाचे दात, नखांसह पाच आरोपींना अटक', www.loksatta.com, २५.११.२०२१.

## कोकण

### कोकण किनारपट्टीवर येणाऱ्या सागरी कासवांचा विणीचा हंगाम यंदा लांबला

दरवर्षी हिवाळ्याच्या सुरुवातीला कोकण किनारपट्टीवर विणीसाठी येणाऱ्या ऑलिव्ह रिडले कासवांचा विणीचा हंगाम यंदा बदलत्या हवामानामुळे लांबला असल्याचे निरीक्षण स्थानिक वन्यजीव संरक्षकांनी नोंदवले आहे.


हिवाळ्याच्या सुरुवातीला मंडणगड तालुक्यातील वेळाससह रत्नागिरी जिल्ह्यातील १८ ठिकाणी ऑलिव्ह रिडले कासवे दरवर्षी येऊन अंडी घालतात. वेळासच्या किनाऱ्यावर २००२ पासून कासवांच्या संवर्धनाचे काम चालू आहे. पिल्ले बाहेर पडण्याच्या काळात वेळासमध्ये पर्यटकांसाठी 'कासव महोत्सव' आयोजित केला जातो.

२०१६-१७ पर्यंत साधारणत: दरवर्षी ऑक्टोबर-नोव्हेंबरपासून इथे ही कासवे विणीसाठी येतात. मात्र, गेल्या चार-पाच वर्षांपासून हा हंगाम उशिरा सुरू होत आहे. या वर्षी तर तब्बल दोन महिने उशिरा, १९ डिसेंबर, २९ डिसेंबर, ३१ डिसेंबर व २ जानेवारी रोजी कासवांची घरटी प्रथम आढळली आहेत, अशी माहिती या मोहिमेची सुरुवात करणारी स्वयंसेवी संस्था 'सह्याद्री निसर्ग मित्र'च्या प्रतिनिधीने दिली. हवामानातील बदल, हा यामागील एक प्रमुख घटक असल्याचे निरीक्षण संस्थेने नोंदवले.

राजापूर तालुक्यातील वेत्ये इथे ऑलिव्ह रिडले कासवाची ६१ अंडी जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात आढळून आली. ह्या वर्षीचे तालुक्यातील हे पहिले घरटे ठरले आहे. त्यापाठोपाठ माडबन इथल्या किनाऱ्यावरही ऑलिव्ह रिडले कासवाची १०५ अंडी सापडली आहेत.

रत्नागिरी तालुक्यात गावखडी इथे गेली काही वर्षे ही कासवे विणीच्या हंगामात येतात. पण यंदा इथे अजून कासवे आली नसल्याचे स्थानिक कासवमित्रांनी सांगितले.

**सूत्र** – 'कोकण किनाऱ्यावरील कासवांच्या विणीचा हंगाम लांबला; बदलत्या हवामानाचा परिणाम', www.loksatta.com, ०७.०१.२०२२.



### वेळास इथे ऑलिव्ह रिडले कासवाचे उपग्रह अंकन; पश्चिम किनारपट्टीवर प्रथमच


रत्नागिरी जिल्ह्यातील वेळास इथे ऑलिव्ह रिडले कासवाच्या मादीला यशस्वीरित्या उपग्रह अंकन करण्यात आले. भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील ऑलिव्ह रिडले समुद्री कासवाचे हे अशा प्रकारचे पहिलेच अंकन आहे. ह्यापूर्वी ऑलिव्ह रिडले समुद्री कासवांना भारताच्या पूर्व किनाऱ्यावर अंकन केले आहे.

महाराष्ट्राच्या किनाऱ्यावर अंडी घालण्यासाठी येणाऱ्या ऑलिव्ह रिडले समुद्री कासवांच्या स्थलांतराचा अभ्यास करण्यासाठीचा संशोधन प्रकल्प महाराष्ट्र वन

विभागाच्या कांदळवन कक्षाने 'वाइल्डलाइफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया'कडे सोपवला आहे. उपग्रह अंकनाच्या सहाय्याने कासवाच्या स्थानांचे संकेत उपग्रहामार्फत संशोधकांना मिळतील. ह्या प्रकल्पाचा खर्च सुमारे ९,८७,००० रुपये आहे. प्रकल्पांतर्गत पाच ऑलिव्ह रिडले कासवांना उपग्रह अंकन केले जाणार आहे, त्यापैकी पहिले मंडणगड तालुक्यातील वेळासमध्ये केले. त्यानंतर ह्या कासवाला परत समुद्रात सोडले.

ह्या कासवाला 'प्रथमा' असे नाव देण्यात आले आहे, कारण ते महाराष्ट्रात आणि भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरही उपग्रह अंकन केलेले पहिले कासव आहे.

**सूत्र** - 'समुद्री कासव संवर्धनाच्या क्षेत्रात महाराष्ट्राला आगळं वेगळं यश; निमित्त ठरलं 'प्रथमा' कासव'', www.loksatta.com, २५.०१.२०२२.



### कोकणात खवलेमांजराच्या तस्करीत वाढ

तस्करीमुळे कोकणात खवलेमांजर (पँगोलीन) या दुर्मीळ प्राण्याचे अस्तित्त्व धोक्यात आले आहे. गेल्या काही वर्षांत कोकणात खवलेमांजराच्या तस्करीच्या अनेक घटना समोर आल्या आहेत.

महाड इथल्या टोळजवळ खवलेमांजराची तस्करी करणारे महाड तालुक्यातील तिघे व सातारा तालुक्यातील दोघे अशा एकूण पाच जणांना रोह्याच्या वन विभागाने पकडले. त्यांच्याकडून खवलेमांजर आणि रानडुकराचे सुळे, तीन वाहने व इतर साहित्य जप्त करण्यात आले आहे.

रायगड जिल्ह्यात गेल्या काही वर्षांत खवलेमांजर तस्करीची अनेक प्रकरणे समोर आली आहेत. गेल्या वर्षी श्रीवर्धन, मुरुड, अलिबाग, महाड, खोपोली, सुधागड पाली, कर्जत, पनवेल आदी भागांतून खवलेमांजर तस्करीची प्रकरणे उघडकीस आली.

आंतरराष्ट्रीय बाजारात खवलेमांजराला चांगली किंमत मिळते. त्यामुळे या प्राण्याच्या तस्करीत मोठी वाढ झाल्याचे दिसून येत आहे.

'सिस्केप' या स्वयंसेवी संस्थेचे अध्यक्ष प्रेमसागर मिस्त्री यांनी सांगितले की खवलेमांजराच्या तस्करीचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन व्यापक उपाययोजना करण्याची गरज आहे. खवलेमांजराचे अस्तित्त्व असलेले क्षेत्र संरक्षित करणे, वन्यजीव कायद्यांतर्गत अधिसूचीतील वन्यजीवांच्या तस्करीबाबत कारवाईचे नियम आणखी कडक करणे, स्थानिक निसर्गप्रेमी संस्था गावातील वन समिती आदींच्या माध्यमातून गावागावांतून जनजागृती अभियान राबवणे अशा काही उपाययोजना करता येतील.

**सूत्र** - हर्षद कशाळकर. 'तस्करीमुळे खवलेमांजराचे अस्तित्त्व धोक्यात', www.loksatta.com, १४.०१.२०२२.

## माणूस-बिबट्या

### चार महिन्यांत १८० किमी प्रवास करून बिबट्या जुन्नर वनपरिक्षेत्रात परतला

ऑक्टोबर २०२१ पासून अंबरनाथ आणि कल्याण तालुक्याच्या वेशीवर असलेल्या जंगल परिसरात वावरणारा आणि अनेकदा मानवी वस्तीत शिरणारा बिबट्या अखेर जुन्नर वनपरिक्षेत्रात परतला.

ऑक्टोबर महिन्यात पहिल्यांदा या बिबट्याने कल्याण तालुक्यातील एका वस्तीवर पाळीव प्राण्यांची शिकार केली होती. त्यानंतर सलग तीन महिने तो विविध ठिकाणी दिसून आला. जुन्नर वनपरिक्षेत्रातील अभ्यासकांनी या बिबट्याला रेडिओ कॉलर लावली आहे. त्यामुळे त्याचा ठावठिकाणा कळत होता. नुकताच या बिबट्याने जुन्नर वनपरिक्षेत्रात प्रवेश केल्याची माहिती वन

## माणूस-बिबट्या संघर्ष संक्षिप्त वृत्त

| जिल्हा | तालुका | घटना | सूत्र |
|---|---|---|---|
| अहमदनगर | राहुरी | श्रीरामपुरात बिबट्याच्या हल्ल्यात एका वनकर्मचाऱ्याचा मृत्यू; अन्य सात जखमी | ई-सकाळ, ०८.१२.२०२१ |
| ठाणे | - | घोडबंदर टोलनाक्याजवळ मृत बिबट्या आढळला | लोकमत, १९.०१.२०२२ |
| नागपूर | नारखेड | बानोर नियतक्षेत्रात थडीपवनी बानोर रस्त्यालगत मृत बिबट्या आढळला; शिकार झाल्याची शक्यता | लोकसत्ता, ०६.१०.२०२१ |
| सातारा | कऱ्हाड | तालुक्यात ठिकठिकाणी बिबट्याचे चार लहान मुलांवर हल्ले; पैकी एका घटनेतील मुलाचा मृत्यू | ई-सकाळ, २४.०१.२०२२ |
| | | किरपे इथे ५ वर्षीय मुलावर हल्ला करणारा बिबट्या जेरबंद | ई-सकाळ, २६.०१.२०२२ |
| | | वाठार इथे वाहनाच्या धडकेत बिबट्या ठार | ई-सकाळ, २६.१२.२०२१ |

विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली आहे. त्यामुळे ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ, कल्याण या तालुक्यातील ग्रामस्थांनी सुटकेचा निश्वास सोडला आहे.

अंबरनाथ तालुक्याच्या वेशीवर असलेल्या तीन झाडी परिसरातील जंगलात चरण्यासाठी गेलेल्या एका वासराची शिकार या बिबट्याने केली होती. त्यानंतर कल्याण आणि अंबरनाथ तालुक्यांतील जांभूळ, वसत, शेलवली, भिसोळ या गावांच्या वेशीवर आणि जंगल क्षेत्राच्या जवळ असलेल्या वस्त्यांमध्ये बिबट्याने पाळीव प्राण्यांची शिकार केली. ग्रामीण भागात फेरफटका मारणाऱ्या या बिबट्याने काही दिवसांपूर्वी अंबरनाथ शहरात असलेल्या आयुध निर्माण संस्थेच्या परिसरातही फेरफटका मारला होता. अंबरनाथ जवळच्या जांभूळ इथल्या जलशुद्धीकरण केंद्रात, कल्याण अहमदनगर राष्ट्रीय महामार्गावर रायते भागात तर बदलापूर शहराच्या मांजर्ली परिसरात हा बिबट्या फिरला होता. उल्हासनगर शहराजवळ असलेल्या सोंग्याची वाडी परिसरातही बिबट्याला पाहिल्याचे स्थानिकांनी सांगितले होते.

पशुधनाची होणारी शिकार आणि ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण यामुळे जांभूळ, वसत, शेलवली या ग्रामपंचायतींनी ग्रामसभेमध्ये ठराव करत या बिबट्याला संरक्षित वनक्षेत्रात स्थलांतरित करण्याची मागणी केली होती. त्यावर वन विभागाकडून प्रक्रियाही सुरू होती.

दरम्यान, १३ जानेवारी नंतर या बिबट्याचा कल्याण आणि अंबरनाथ तालुक्यातील वावर कमी झाल्याचे दिसून आले. १४ जानेवारी नंतर ह्या बिबट्याने जुन्नर वनपरिक्षेत्रात प्रवेश केल्याचे स्पष्ट झाले.

सप्टेंबर महिन्यात जुन्नर वनक्षेत्रात रेडिओ कॉलर लावून सोडण्यात आलेल्या बिबट्याने गेल्या तीन महिन्यात सुमारे १८० किमी अंतर प्रवास केला. २० ऑक्टोबर २०२१ ते १४ जानेवारी २०२२ या काळात उल्हासनगर ते बदलापूर या वनक्षेत्राच्या ५८ चौरस किमी परिसरात बिबट्याने वास्तव्य केले. या प्रवासात त्याने काळू, उल्हास या नद्या अनेकदा ओलांडल्या. कल्याण अहमदनगर राष्ट्रीय महामार्ग आणि टिटवाळा भागातून जाणारे रेल्वे रूळही या बिबट्याने ओलांडल्याचे समोर आले आहे. त्याच्या या वावरामुळे अनेक बाबी समोर आल्याची माहिती 'वाइल्डलाईफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया'च्या संशोधकांनी दिली.

**सूत्र** – सागर नरेकर. 'बिबट्याची घरवापसी! अंबरनाथ, बदलापूरकरांना दिलासा; 'तो' बिबट्या जुन्नरला परतला', www.loksatta.com, २७.०१.२०२२.

## राष्ट्रीय बातम्या

### संरक्षित क्षेत्रात प्रकल्प उभारणीसाठी निश्चित शुल्क आकारणी नाही

संरक्षित क्षेत्रात आणि संवेदनशील पर्यावरण क्षेत्रात येणाऱ्या प्रकल्पांचा त्या त्या क्षेत्रावर होणारा प्रभाव कमी करण्यासाठी निश्चित शुल्क वसूल करण्याऐवजी प्रकल्पाच्या प्रस्तावाची शिफारस करताना प्रभाव शमन उपाय आणि संबंधित खर्च निर्धारित करण्याचा निर्णय राष्ट्रीय वन्यजीव मंडळाने घेतला आहे.

संरक्षित क्षेत्र आणि पर्यावरण संवेदनशील क्षेत्रात येणाऱ्या प्रकल्पांमुळे त्यावर होणाऱ्या परिणामावर प्रभाव शमन उपाययोजना आखण्यासाठी प्रकल्पाच्या प्रमाणित खर्चाच्या दोन टक्के निधी त्या प्रकल्पांकडून वसूल केले जाऊ शकतात (पाहा *महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र खंड २ अंक ४ क्र.* ७), अशी शिफारस राष्ट्रीय वन्यजीव मंडळाच्या स्थायी समितीने ऑगस्ट २०२१ मध्ये झालेल्या बैठकीत केली होती. त्यानंतर २४ सप्टेंबर २०२१ रोजी झालेल्या मंडळाच्या बैठकीत संरक्षित क्षेत्र आणि संवेदनशील पर्यावरण क्षेत्रातील प्रकल्पांचे परिणाम कमी करण्यासाठी केल्या जाणाऱ्या उपाययोजना हा प्रकल्प प्रस्तावाचाच एक भाग असावा, असा निर्णय घेण्यात आला. उपाययोजनांशी संबंधित खर्च निर्धारित करण्यासाठी पर्यावरण मंत्रालय राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांना सल्लागार नेमून देईल, असेही स्थायी समितीने सांगितले.

**सूत्र** – 'संरक्षित, पर्यावरण संवेदनशील क्षेत्रात येणाऱ्या प्रकल्पांवर निश्चित शुल्क नाही', www.loksatta.com, १८.१०.२०२१.



### भारतातील पाच पक्षी प्रजातींच्या IUCN रेड लिस्टमधील धोक्याच्या श्रेणींत बदल

फिन्न्स वीवर आणि लेसर फ्लॉरीकन ह्या पक्ष्यांच्या अस्तित्त्वाला असलेल्या धोक्याची तीव्रता वाढली आहे. 'इंटरनॅशनल युनिअन फॉर कॉन्झर्वेशन ऑफ नेचर' (IUCN) च्या विविध प्रजातींच्या अस्तित्त्वाला असलेल्या धोक्याची तीव्रता दर्शवणाऱ्या 'रेड लिस्ट' नावाने ओळखल्या जाणाऱ्या यादीत हे निदर्शनास आले आहे. ह्या यादीत जगभरातील २७ पक्षी प्रजातींच्या धोक्याच्या श्रेणींमध्ये बदल झाला आहे. त्यामध्ये भारतात आढळणाऱ्या पाच प्रजातींचा समावेश आहे.

फिन्न्स वीवर पक्ष्याचा समावेश रेड लिस्टमध्ये 'वल्नरेबल' श्रेणीत होता. तो आता 'एन्डेजर्ड' श्रेणीत करण्यात आला आहे. लेसर फ्लॉरीकन हा पक्षी 'एन्डेजर्ड' श्रेणीतून 'क्रिटिकली एन्डेजर्ड' श्रेणीत आला आहे. ह्या दोन्ही प्रजाती गवताळ अधिवासात आढळणाऱ्या असून असे गवताळ अधिवास नाहीसे होत असल्यामुळे धोक्यात आल्या आहेत.

फिन्न्स वीवर प्रजातीचे ५०० पेक्षा कमी पक्षी भारतात उरले असून ते प्रामुख्याने तेराईच्या गवताळ प्रदेशात व त्यापाठोपाठ उत्तराखंड, उत्तर प्रदेशचा पश्चिम भाग आणि असममधील काही ठिकाणी आढळतात. ह्या प्रजातीला असलेला धोका लक्षात घेऊन तिच्या रेड लिस्टमधील श्रेणीबदलासाठी 'बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी' (BNHS) ही स्वयंसेवी संस्था गेली चार वर्षे प्रयत्नशील होती. संस्थेतील पक्षीतज्ञ रजत भार्गव यांनी सांगितले की श्रेणीबदलामुळे ती वाचवण्यासाठी मदत होईल, अशी आशा आहे. फिन्न्स वीवरचे बंदिवासात प्रजनन शक्य करण्याचा BNHS चा मानस आहे. ह्या प्रयोगाला येत्या एप्रिल महिन्यात सुरुवात होईल, अशी अपेक्षा आहे.

निकोबार-इम्पिरीअल पिजन, ग्रीन इम्पिरीअल पिजन आणि माउण्टन हॉक ईगल हे तीन पक्षी धोका

नसलेल्या – 'लीस्ट कन्सर्न्ड' श्रेणीत होते; ते आता 'नीअर थ्रेटण्ड' श्रेणीत आले आहेत.

**सूत्र -** संदीप राय. 'Finn's weaver now uplisted as 'endangered' bird in IUCN updated list, 4 other birds of India in status reshuffle', www.timesofindia.indiatimes.com, १०.१२.२०२१.

## वर्ष २०२१ मध्ये पहिल्या दहा महिन्यांत देशात १०२ वाघांचा मृत्यू

ऑक्टोबर २०२१ पर्यंत देशात १०२ वाघांचा मृत्यू झाला. त्यातील नऊ वाघांची शिकार झाली आहे. हद्द प्रस्थापित करण्यासाठी संघर्ष व वीजेचा धक्का लागणे ही व्याघ्रमृत्यूची अन्य कारणे आहेत.

सर्वाधिक मृत्यू मध्य प्रदेशात व त्यापाठोपाठ महाराष्ट्रात झाले आहेत. २०२० या वर्षात १०६ वाघांचा मृत्यू झाला होता. यंदा ५२ टक्के व्याघ्रमृत्यू म्हणजे १०२ पैकी ५३ मृत्यू हे व्याघ्र प्रकल्प व अतिसंरक्षित भागात झाले आहेत. यात शिकारीच्या घटनांचादेखील समावेश आहे.

**वर्ष २०२१ मधील राज्यनिहाय व्याघ्रमृत्यू**

| राज्य | २०२१ जाने. ते ऑक्टो. व्याघ्रमृत्यू |
|---|---|
| मध्य प्रदेश | ३२ |
| महाराष्ट्र | २० |
| कर्नाटक | १५ |
| उत्तर प्रदेश | ९ |
| केरळ | ६ |

**गेल्या पाच वर्षांत देशात झालेले व्याघ्रमृत्यू**

| वर्ष | देशातील व्याघ्रमृत्यू |
|---|---|
| २०१७ | ११६ |
| २०१८ | १०२ |
| २०१९ | ९५ |
| २०२० | १०६ |
| २०२१ जाने. ते ऑक्टो. | १०२ |

**सूत्र** – पंकज मोहरीर. 'धक्कादायक! गमावले १०२ वाघ, 'ही' आहेत कारणे', maharashtratimes.com, २५.१०.२०२१.

## महाराष्ट्रासह अन्य सहा राज्यांच्या वन विभागांत सामील होणार १४ प्रशिक्षित कुत्रे



वन्यजीव गुन्ह्यांचा तपास करण्यासाठी आवश्यक प्रशिक्षण दिलेले १४ कुत्रे आणि त्यांना हाताळण्यासाठी २८ व्यक्तींचा महाराष्ट्रासह छत्तीसगड, कर्नाटक, ओदिशा, उत्तर प्रदेश, गुजरात आणि तमिळनाडू या राज्यांच्या वन विभागांत समावेश केला जाणार आहे. हरयाणातील पंचकुला इथल्या इंडो-तिबेटन सीमा पोलीस बलाच्या छावणीत असलेल्या प्राथमिक प्रशिक्षण केंद्रात या कुत्र्यांचे सात महिन्यांचे प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांना वेगवेगळ्या राज्यांमध्ये पाठवण्यात येणार आहे.

वर्ष २००८ पासून महाराष्ट्र वन विभागाला १० प्रशिक्षित कुत्रे मिळाले आहेत. या खेपेला महाराष्ट्रातील अमरावती, गोंदिया आणि पांढरकवडा वन विभागांना प्रत्येकी एक असे तीन कुत्रे दिले जाणार आहेत. छत्तीसगड, कर्नाटक, ओदिशा या राज्यांना प्रत्येकी दोन, उत्तर प्रदेश, गुजरात आणि तमिळनाडू या राज्यांना प्रत्येक एक; तर उर्वरित दोन कुत्रे रेल्वे सुरक्षा बलात समाविष्ट केले जाणार आहेत. गेल्या वर्षी प्रथमच रेल्वेमार्गाने होणाऱ्या वन्यजीव तस्करीला आळा घालण्यासाठी दोन कुत्र्यांचा रेल्वे सुरक्षा बलात समावेश करण्यात आला.

'ट्रॅफिक – इंडिया' आणि 'वर्ल्ड-वाइड फंड फॉर नेचर – इंडिया' ह्या दोन संस्थांनी एकत्र येऊन २००८ पासून वन्यजीव गुन्ह्यांच्या तपासाला मदत म्हणून प्रशिक्षित कुत्रे देण्याचा उपक्रम सुरू केला. तेव्हापासून आजवर ८८ कुत्र्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे.

**सूत्र** – विजय पिंजरकर. 'Soon, 14 new sniffers to join India's wildlife dog force', www.timesofindia.indiatimes.com, २३.११.२०२१.

### वन्यजीव संरक्षण कायद्यातील प्रस्तावित बदलांना तज्ञांचा आक्षेप

वन्यजीव संरक्षण कायदा १९७२ मध्ये केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाने प्रस्तावित केलेल्या काही सुधारणांना तज्ञांनी आक्षेप दर्शवला आहे.

वन्यजीव संरक्षण कायदा सुधारणा विधेयक २०२१ संसदेच्या हिवाळी अधिवेशनात सभागृहांत मांडण्यात आले आणि संसदीय स्थायी समितीकडे पाठवण्यात आले. विधेयकाच्या मसुद्यातील काही तरतुदींबाबत 'नेचर कॉन्झर्वेशन फाउण्डेशन' आणि 'लीगल इनिशिएटिव फॉर फॉरेस्ट एण्ड एन्वॉयर्न्मेंट' या संस्थांमधील तज्ञांनी आक्षेप नोंदवले आहेत.

विधेयकाच्या मसुद्यात राज्य वन्यजीव मंडळांतर्गत स्थायी समिती स्थापन करून ह्या समितीला मंडळाच्या जबाबदाऱ्यांबरोबर हक्क व अधिकारही द्यावेत, अशी तरतूद आहे. ह्या तरतुदीमुळे राज्य वन्यजीव मंडळांकडून प्रस्तावित प्रकल्पांची केली जाणारी छाननी, परीक्षण पुरेसे कठोरपणे होणार नाही, असे तज्ञांनी म्हटले आहे. अशा प्रकारचा अनुभव राष्ट्रीय वन्यजीव मंडळाबाबत येत आहेच, असे निरीक्षण त्यांनी नोंदवले आहे. पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखालील राष्ट्रीय वन्यजीव मंडळाच्या स्थायी समितीची बैठक वर्ष २००४ पासून झालेली नाही, ह्याकडे जाणकारांनी लक्ष वेधले आहे.

वन्यजीव संरक्षण कायद्याच्या ४३ व्या कलमात सुचवलेल्या सुधारणेमुळे हत्तींच्या खरेदीविक्रीला कायद्याने प्रतिबंध करता येणार नाही, ह्याकडे तज्ञांनी लक्ष वेधले आहे. उपऱ्या (इनवेझिव) प्रजातींचा कायद्यात समावेश करण्याबाबत सुधारणा विधेयकात नमूद केले आहे. मात्र, त्याबद्दल पुरेशी स्पष्टता नाही. ह्या संदर्भात वैज्ञानिक आणि पारदर्शक पद्धत असणे गरजेचे असल्याचे तज्ञांनी म्हटले आहे.

विधेयकाच्या मसुद्यात कायद्याच्या ६२ व्या कलमात बदल सुचवण्यात आला आहे. ह्या बदलानुसार कायद्यातील अधिसूची १ मधील प्रजाती वगळता इतर कोणत्याही प्राण्याला 'उपद्रवकारक' जाहीर करण्याची मोकळीक केंद्र सरकारला देण्यात येणार आहे. एखादी प्रजाती उपद्रवकारक म्हणून जाहीर झाली की तिला कायद्याने मिळणारे संरक्षण काढून घेतले जाते व तिच्या संख्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी तिच्या व्यापाराची वा तिला ठार करण्याची मुभाही दिली जाते. त्यामुळे हा प्रस्तावित बदल मान्य झाला तर अधिसूची १ वगळता इतर अधिसूचींमधील प्रजातींचे, जसे की स्ट्राइप्ड हाइना, अंदमान वाइल्ड पिग, इंडियन फॉक्स, बेंगाल फॉक्स, जंगल कॅट, एशियाटिक जॅकल या अधिसूची २ मधील प्रजातींसह इतरही प्रजातींना कायद्याने असलेले संरक्षण काढून घेतले जाण्याला वाव मिळेल.

**सूत्र** – रिचा शर्मा. 'Draft amendments in Wild Life Protection Act face flak from experts', www.newindianexpress.com, १९.०१.२०२२.
विश्व मोहन. 'Experts flag loopholes in proposed amendment in Wildlife Protection Act, saying it will allow', timesofindia.indiatimes.com, ११.०१.२०२२.

### भारतात चित्ते आणण्यासाठी व्याघ्र प्रकल्पातून निधीची तरतूद

वर्ष २०२१-२२ ते २०२५-२६ या काळात दक्षिण आफ्रिका, नामिबियासह इतर आफ्रिकी देशांमधून १२ ते १४ चित्ते भारतात आणले जातील. याकरता त्या देशांशी सल्लामसलत सुरू असून केंद्र सरकारने व्याघ्र प्रकल्पासाठी देत असलेल्या निधीतून जवळपास ३९ कोटी रुपये देणार असल्याचे जाहीर केले आहे. केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल, राज्य मंत्री अश्विनी कुमार चौबे यांनी जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात लोकसभेत ही माहिती दिली.

**सूत्र** – 'आफ्रिकी देशातून भारतात चित्ते आणण्यासाठी सल्लामसलत बैठका जारी- व्याघ्र प्रकल्पातून ३८.७० कोटी रुपयांची तरतूद', पत्र सूचना कार्यालय, भारत सरकार, ०७.०२.२०२२.

## Three distinctive books from the *PA Update* stable

The set of 3 available for a special discounted price of Rs. 1000


Get a comprehensive view of conservation and protected area management issues from across India


News, information and perspective collated from 25 years of publishing the


*Protected Area Update*


1) *Conservation Kaleidoscope: People, Protected Areas and Wildlife in Contemporary India*, 2021, 450 pp, 140 line-drawings., Price: 650
2) *The State of Wildlife and Protected Areas in Maharashtra: News and Information from the Protected Area Update 1996-2015,* 2019. 250 pp, 100 line-drawings, Price: Rs. 400
3) *The State of Wildlife in North-East India 1996-2011: A compilation of news from the Protected Area Update,* 2013, 330 pp, 100 line-drawings, Price: Rs. 300

**For more details and to order copies, pls write to psekhsaria@gmail.com**



## थोडक्यात पण महत्त्वाचे...

### चतुर आणि टाचणी – सिंधुदुर्ग जिल्ह्यातील विविधता

पृथ्वीवर चतुराचे अस्तित्त्व साधारणपणे २५० लक्ष वर्षांपूर्वीपासून असल्याचे अभ्यासकांचे मत आहे. प्राचीन कलाकृतींमध्येही ह्या चतुरांचा उल्लेख अनेकदा झालेला दिसतो. चतुर आणि टाचणी या दोघांना प्राण्यांच्या वर्गीकरणात 'ओडोनाटा' या गणात समाविष्ट केले आहे. चतुराला 'ड्रॅगनफ्लाय' तर टाचणीला 'डॅमसलफ्लाय' म्हटले जाते.

मिलनानंतर चतुराची मादी पाण्यात किंवा पाणवनस्पतींवर अंडी घालते. नराच्या शरीराचा रंग मादीला आकर्षित करण्यासाठी मदत करतो. चतुरांमध्ये मेंदूला रंगाची माहिती देणाऱ्या 'ओपसिन' जनुकांची संख्या माणसांपेक्षा जास्त असते, म्हणून चतुर त्यांच्या आजूबाजूला होणाऱ्या सूक्ष्म हालचाली पटकन ओळखू शकतात. एका अभ्यासात असे लक्षात आले आहे की वाघ, सिंहासारख्या प्राण्यांची भक्ष्य पकडण्याची क्षमता ही ५०टक्के असते तर चतुरांची ९५ टक्क्यांपेक्षा जास्त असते. चतुरांच्या या वैशिष्ट्यांसोबतच ते पर्यावरणाचा समतोल राखण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. पिकाला लागणारी कीड किंवा डेंग्यूसारखे रोग पसरवणाऱ्या डासांच्या अळ्यांना नियंत्रणात ठेवण्याचे महत्वाचे काम चतुर करतात. शिवाय वातावरणात होणाऱ्या सूक्ष्म बदलांचे ते उत्तम निर्देशक मानले जातात.

जगात आजवर चतुर आणि टाचणीच्या मिळून ६००० प्रजातींचा शोध लागला आहे. त्यापैकी भारतात साधारणपणे ५००, महाराष्ट्रात १८० पेक्षा अधिक; तर सिंधुदुर्ग जिल्ह्यात जवळपास १०५ प्रजाती दिसून येतात. २०१९-२० या वर्षात सिंधुदुर्ग जिल्ह्यात चतुराच्या दोन नव्या प्रजातींचा शोध लागला. 'सेरियाग्रियॉन क्रोमोथोरॅक्स' (सिंधुदुर्ग मार्श डार्ट) आणि 'ब्रॅडिनोपाया कोंकणेन्सिस' (कोकण रॉकड्वेलर) या दोन नव्या प्रजाती डॉ. दत्तप्रसाद सावंत आणि शंतनू जोशी यांनी ओळखल्या. त्यापाठोपाठ डॉ. योगेश कोळी यांच्यासह मी केलेल्या संशोधनात गेल्या वर्षभरात आम्हाला चतुराच्या जवळपास नऊ प्रजाती महाराष्ट्रात पहिल्यांदाच दिसून आल्या आहेत. ह्या प्रजातींची ह्यापूर्वी महाराष्ट्रात अधिकृत नोंद नव्हती. यापैकी 'ॲग्रिओनेमिस केरलेन्सिस' (केरळ डार्टलेट), 'गायनाकान्था खासियाका' आणि दोडामार्ग तालुक्यातील मिरिस्टिका स्वॉम्प इथे सापडलेली 'मेल्यानोन्यूरा बायलिनियाटा' ही टाचणी ह्यांच्या बाबतचे संशोधन 'जर्नल ऑफ थ्रेटण्ड टॅक्सा' संशोधनपत्रिकेत प्रकाशित झाले आहे.

आंबोलीसह सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यात आढळणारे विस्तीर्ण सडे, पाणथळ जमिनी, सह्याद्रीतून उगम पावणाऱ्या पश्चिमवाहिनी नद्यांचा परिसर, भातशेती व लगतचे ओहोळ हे या प्रजातींचा महत्त्वाचा अधिवास आहेत. सिंधुदुर्ग जिल्ह्यात असे समृद्ध अधिवास असूनही नकळत किंवा अशास्त्रीय विकासापोटी जिल्ह्यातील बराचसा नैसर्गिक अधिवास धोक्यात आला आहे. निसर्गातील अन्नसाखळयांमध्ये वाघासारखे प्राणी जितके महत्त्वाचे आहेत तितकेच महत्त्वाचे कीटकही आहेत. तेव्हा त्यांचे जीवनचक्र आणि त्यांच्यामधील वैविध्य याबद्दल अधिकाधिक संशोधन झाल्यास सिंधुदुर्गातील हेच वैशिष्ट्यपूर्ण अधिवास आणि चतुरांमधील ही विविधता अबाधित ठेवण्यासाठी नक्कीच मदत होईल.

**- अक्षय दळवी**

asdalvi25@gmail.com

(लेखक चतुरांविषयी सिंधुदुर्ग जिल्ह्यात अभ्यास करतात.)

For private circulation/Printed Matter/Bookpost

To

From: **Kalpavriksh,** Apt. 5, Sri Dutta Krupa, 908 Deccan Gymkhana, Pune 411004